**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १११ | गुरूवार, दि. १२ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### छ.संभाजीनगरमध्ये सोसाट्याचा वारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर शहरात सायंकाळी सहाच्या सुमारास धुळीचे वादळ निर्माण झाले होते. सोसाट्याच्या वाऱ्यासह धुळीचे लोट सर्वत्र पसरले होते. शहरातील सातारा परिसरात अक्षरशः समोरचे दिसत नव्हते इतकी धूळ पसरली होती. जवळपास १५-२० मिनिटे हा वादळी वारा सुरू राहिला होता.

### पवारांनी मानले नरेंद्र मोदी यांचे आभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी सुप्रिया सुळे गेल्या असता, मोदींनी शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपूस केली असल्याची माहिती समोर आली होती. पंतप्रधानांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केल्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भात शरद पवार यांनी दोनच शब्दात पंतप्रधानांनी केलेल्या चौकशी बद्दल आभार मानले आहेत.

### कडूंच्या आंदोलनाचा चौथा दिवस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अमरावती** : प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांचे अमरावतीतील अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. बच्चू कडूंना समर्थन देण्यासाठी प्रहारच्या दिव्यांग कार्यकर्त्यांकडून मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले.




# जलजीवनच्या आजारावर शोधला जातोय तीन वर्षानंतर इलाज

## उदंड तक्रारीनंतर अचानक उघडू लागले तोंड : जिल्हा परिषदेत खमंग चर्चा

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : जिल्हा परिषदेतील जलजीवन आजाराबाबत विद्यमान खासदारांसह जिल्ह्यातील ग्रामपंचायत पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवून तो आजार बरा करण्याचा टाहो फोडला होता. परंतु, त्या आजावर काही केल्या इलाज झाला नाही. तीन वर्षे आजार दिसूनही अनेकांनी मौन बाळगले होते. मात्र आता त्या आजारावर काहींनी मौन सोडले असून आजार किती गंभीर आहे, याची माहिती सर्वांना देऊ लागलेले आहे. त्यामुळे मौन सोडणाऱ्यांविषयीच आता जिल्हा परिषदेत खमंग चर्चा असून तीन वर्षे सर्व त्रास आम्ही सहन केला. तेव्हा हीच मंडळी गप्प होती. आता यांना नेमका कोणता साक्षात्कार झाला. त्यामुळे यांचे मौन उघडले असा सवाल आता जिल्हा परिषदेतील कर्मचारी करु लागले आहेत.**

### खबर लिक करणारे कोण

जिल्हा परिषदेत काम करून अंतर्गत माहिती लिक करणाऱ्यांची टोळीच मुख्यालयात कार्यरत असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु आहे. ही टोळी स्वतःचा स्वार्थ साधला नाही तर कार्यालयातील अंतर्गत गोष्टी बाहेरील लोकांना देऊन अधिकारी व कर्मचारी यांना अडचणीत आणत आहे. या टोळीने आता जलजीवनमधील कामांतील उणिवा बाहेर व काही भानगडी सांगण्यास सुरवात केल्याची चर्चा आहे. त्यामुळे अशा मंडळींचा शोध घेऊन जिल्हा प्रशासनाने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यात जलजीवनची कामे सुरु आहेत. विशेष म्हणजे गेल्या तीन वर्षांच्या काळात जिल्हा परिषदेमध्ये प्रशासकराज होते. या प्रशासक राज काळात जलजीवनची कामे वेगाने झाली. यातील अनेक कामांबाबवर खा. नीलेश लंके यांनी आक्षेप नोंदविलेले आहे. तसेच अनेक गावांमधूनही जलजीवनच्या कामांवर नाराजी व्यक्त करून कामांची चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहे.

तसेच जलजीवनचे कामे करण्यासाठी जिल्हा परिषदेत काही खास माणसेही होती. ही माणसे आता जलजीवन विभागातून बाहेर पडलेली आहेत. तर काही अजूनही त्याच जागेवर खिळून आहेत. मात्र या जलजीवनचे काम करताना अनेकांची तब्बेत मात्र चांगलीच सुधारली असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेत आहे. काहींना तब्बेत सुधारल्याने तसेच वरिष्ठ बदलून जाणार असल्याने वातावरण बदल करून घेतला असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु आहे.

जलजीवनच्या कामासह तेथील कामकाजावर एका मागून एक जिल्ह्यात तक्रारी झालेल्या आहेत. या तक्रारींवर मात्र आवाज उठविणाऱ्यांनी



महेश रक्ताटे

तेरी चूप मेरी चूप असे धोरण धरून मौनव्रत धारण केले होते. हे मौनव्रत आता काहींचे सुटले असून जलजीवनचा आजार किती खोलवर आहे, तो कधीपासून सुरु झाला होता. त्यावर उपाययोजना व्हावी, असा टाहो काही जण फोडू लागलेले आहेत. मात्र मागील तीन वर्षे ही मंडळी गप्प का होती, यांच्या मौनामागे कारण काय असा सवाल आता कर्मचारी उपस्थित करू लागलेले आहे. जलजीवनच्या आजारापेक्षा त्यावर इलाज शोधणाऱ्यांविषयीच आता जोरदार चर्चा सुरु झालेली आहे. कर्मचाऱ्यांमध्ये असलेले एकम ेकांतील हेवेदाव्यातून एकमेकांची बदनामी करण्याचा डाव काहीजण नेहमीच डाव टाकत असतात. हे करताना काहीजण बाहेर पुरवतात. त्यातून आपल्या सहकारी अडचणी यावा हा हेतू त्यांचा असतो. हा प्रकार आता जिल्हा परिषदेमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू झालेला आहे.

यामुळे जिल्हा परिषदेतील प्रत्येक बारीक बारीक घटना सर्वसामान्यांपर्यंत पोहचत आहे. हा प्रकार सर्वांसाठी घातक आहे. हा प्रकार होऊ नये. म्हणून यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालावे अशी मागणी कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

### मौनींचे मौन कसे उघडले

तीन वर्षात सर्वकाही होत असतानाही अनेकांनी पाहून त्यावर मौन बाळगले होते. मात्र त्यांनी अचानक आता मौन सोडल्यामुळे मौनींचे मौन नेमका आता कसे सुटले, अशीच चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु आहे. गेल्या तीन वर्षात मौनी त्यावर काहीच कसे बोलले नाही, असा सवाल उपस्थित करून मौनींच्या मौनावर आर्थिक पट्टी होती का ती सुटल्याने आता तोंड उघडले गेले की काय, अशी चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु झाली आहे.

### सीईओ साहेब, सावध रहा

सीईओ साहेब, तुमच्या आजूबाजूनपासून ते तुमच्या भेटीला येणाऱ्यांपर्यंत सर्वांचीच माहिती घ्या. मगच कोण भरवशाचे कोण बिगर भरवशाचे हे लक्षात घ्या. मगच कामकाजाला सुरवात करा. अन्यथा चौकटीतील मंडळी आपल्या भोवती राहून स्वतःचा स्वार्थ साधून घेतली आणि आपल्याच विरोधात बाहेर कारवाया सुरु करील, हे लक्षात घ्या. पुढच्याला ठेच मागचा शहाणा या म्हणी प्रमाणे आता पुढच्याला ठेच लागलेली आहे. तुम्ही सावध व्हा, हीच जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांची अपेक्षा आहे.

### अनुभव सांगून लुटणारे अधिक

आम्हाला कामाचा अनुभव इतका आहे. आम्ही या अधिकाऱ्यांबरोबर काम केले आहे. हे अधिकारी आमचे खास ओळखीत आहेत. त्यांना आमच्या काम माहिती आहे, अशा बढाया काहीजण सांगतीले, अशांपासूनही आपण सावध राहून बढाया मारणाऱ्यांना दूर ठेवा. अन् चौकट करून कायम येऊन गप्पा मारणारेही दूर ठेवा, कारण चौकटीच्या जोरावरच ही मंडळीच स्वतःची तुमडी भरत असते. अशीच अख्यायिका या चौकटीची आहे. चौकटींमध्ये पात्र काही बदलत असतात. त्यामुळे या चौकटीपासून सीईओ साहेब सावध रहावे, अपेक्षा सर्वसामान्य कर्मचाऱ्यांची आहे.

# शरद पवारांकडून स्व. तनपुरेंना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे काल दि. ११ जून रोजी श्रीरामपूर येथे कार्यक्रमास जात असताना राहुरी फॅक्टरी येथील विवेकानंद नर्सिंग होम येथे त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

काल, दि. ११ जून २०२५ रोजी कै. बाबुरावदादा तनपुरे यांची पुण्यतिथी असल्याने यावेळी शरद पवार यांनी स्व. तनपुरे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.




यावेळी खा. निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, सुरेश वाबळे, हर्ष तनपुरे, रावसाहेब चाचा तनपुरे, डॉ. जयंत कुलकर्णी, शिवाजी कपाळे, आण्णासाहेब चोथे, सुधाकर कदम, आबासाहेब वाळुंज, आदिनाथ कराळे, नंदकुमार तनपुरे, विजय डौले, दत्तात्रय कवाने, अरुण ढुस, महेश उदावंत, संतोष आघाव, विश्वास पाटील, ज्ञानेश्वर वाणी, ज्ञानेश्वर कोळसे, सुयोग नालकर आदी उपस्थित होते.

# उन्हाळ हंगामाचे आर्वतन तत्काळ सोडा

## 'संजीवनी'चे बिपीन कोल्हे यांची नाशिक पाटबंधारे विभागाकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : सध्या दारणा व गंगापूर धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामासाठी आणखी एक पाण्याचे आवर्तन तात्काळ सोडण्यात यावे, अशी ठाम मागणी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी नाशिक पाटबंधारे विभागाकडे केली आहे.

बिपीन कोल्हे यांनी यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, उन्हाळ हंगाम १ मार्च ते ३० जून या कालावधीत असतो. या कालावधीसाठी गोदावरी उजवा व डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी नमुना क्रमांक ७ वर आधारित पाण्याची मागणी केलेली असून ती अधिकृतरीत्या मंजूर देखील झाली आहे.

सध्या कोपरगाव आणि परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी बारमाही ऊस लागवड केलेली असून या पिकास वेळेवर आणि सातत्याने पाण्याचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे.



### नियोजनबद्ध पद्धतीने आवर्तन सोडा : कोल्हे

धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असताना देखील शेतकऱ्यांना पाण्याविना त्यांच्या पिकांचे नुकसान सहन करावे लागणे. ही शासन यंत्रणेची मोठी तांत्रिक चूक ठरेल. त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामासाठी शेतीसाठीचे आणखी एक आवर्तन तातडीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने सोडण्यात यावे, अशी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी मागणी केली आहे.

सध्या गोदावरी कालव्यामार्गे फक्त पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सुरू करण्यात आले आहे, मात्र शेतीसाठी आवश्यक असलेले आवर्तन अद्याप देण्यात आलेले नाही.

# महायुती म्हणून एकत्र लढणार: ना.बावनकुळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांनी जोरदार तयारी देखील सुरू केली आहे. या निवडणुका महायुती एकत्र लढणार की वेगवेगळे लढणार यावर महसूल मंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीतील युतीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले, राज्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्र म हायुती म्हणून लढणार आहोत. याबाबतचे आदेश आम्ही पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. आमचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एकमेकांशी याबाबत चर्चा करत आहेत. जर एखाद्या ठिकाणी एखाद्या जागेवरून वाद निर्माण झाला तर त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र इतर ठिकाणी युतीत निवडणुका लढल्या जातील, त्यामुळे संभ्रम बाळगण्याची गरज नाही.

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी युतीबाबत बोलताना म्हटले की, स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका आम्ही एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र, शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू. यासाठी कार्यकर्त्यांना आतापासूनच तयारीला लागले पाहिजे. आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून पान ४

# सत्ताधाऱ्यांकडून विधानसभेत मॅच फिक्सिंग

## दिल्लीमधील मुलाखतीत बाळासाहेब थोरात यांचा आरोप


**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या गैरप्रकाराबाबत देशाचे नेते खा. राहुल गांधी यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण लेख लिहून सरकारला अनेक प्रश्न विचारले आहेत. यातील प्रश्नांना निवडणूक आयोग समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. भाजप व त्यांचे मित्र पक्ष सत्तेसाठी काहीही करत असून निवडणूक आयोग आता स्वायत्त राहिलेला नाही. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये सत्ताधाऱ्यांकडून मॅच फिक्सिंग करण्यात असल्याची टीका महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

माजी मंत्री थोरात यांनी दिल्लीमध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटले आहे की, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीबाबत अनेक वेळा सरकारला आणि निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले. मात्र अद्यापही निवडणूक आयोग समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. जनतेचे लक्ष वळवण्यासाठी काही मंत्री उत्तर देत आहेत. हे उत्तर देणे काम निवडणूक आयोगाचे आहे.

लोकसभेला महाविकास आघाडीला अत्यंत चांगले वातावरण होते.

विधानसभेलाही चांगले होते. मात्र वाढलेले मतदार, शेवटच्या तासामध्ये वाढलेला म तदानाचा टक्का. आणि भाजपचा १४९ जागांपैकी १३२ विजय, इतका मोठा स्ट्राईक रेट हे सर्व संशयास्पद आहे. पान ४



### निवडणुकीच्या वक्तव्याबाबत देशांत गंभीरतेने विचार

माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्र काँग्रेस म धील वरिष्ठ नेते आहेत. संगमनेर विधानसभा मतदारसंघातून सलग आठ वेळेस विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले आहेत. काँग्रेस आणि महाविकास सर्वात शाश्वत आणि विश्वासाचा संगमनेर मतदार संघातून बाळासाहेब थोरात विजयी होणार ही काळ्या दगडावरची रेघ होती. मात्र येथे अनपेक्षित निकाल आला. संगमनेरचा अनपेक्षित निकाल हा राज्यासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी धक्कादायक ठरला आहे. असे कसे होऊ शकते? हा मोठा प्रश्न राज्यामध्ये उपस्थित झाला. अत्यंत अभ्यासू, शांत, संयमी आणि लोकशाहीवर श्रद्धा असलेल्या माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबतच्या वक्तव्याबाबत देशांमध्ये गंभीरतेने विचार होत आहे.

# तब्बल ११४ इतर धर्मीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती

## 'हिंदू'चा विरोध; १४ जूनला मोर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : हिंदू धर्मियांचे जागृत श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील देवस्थान ट्रस्टमध्ये नोकर भरती करताना तब्बल ११४ इतर धर्मीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचा गंभीर आरोप सध्या नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर खळबळ उडवत आहे. या नेमणुकीने हिंदू भाविकांच्या श्रद्धेवर आणि देवस्थानच्या पारदर्शकतेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित केला असून, विविध हिंदुत्ववादी संघटनांनी याला जोरदार विरोध दर्शविला आहे.

याच पार्श्वभूमीवर १४ जून २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता शनिशिंगणापूर पोलीस स्टेशनपासून ते शनिदेव मंदिरापर्यंत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. 'शुद्ध हिंदू मंदिरात अशुद्ध मानसिकतेच्या लोकांचा प्रवेश का?', असा रोष व्यक्त करत सकल हिंदू समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने या मोर्चाचे नेतृत्व केले जाणार आहे.

या आंदोलनामध्ये आ. संग्राम जगताप, सागर बेग, तुषार भोसले आदी हिंदुत्वनिष्ठ नेते उपस्थित राहून धर्मरक्षणाचा निर्धार जनतेसमोर मांडणार आहेत. हिंदूंच्या पान ४

मागील काही दिवसांपूर्वी देखील शनि देवाच्या चौथऱ्याच्या दुरुस्तीचे काम मुस्लिम धर्मीय कामगारांना देण्यात आले होते. शनी देवाच्या पवित्र शिळे पाशी या लोकांना काम करताना पाहून स्थानिक नेत्यांनी आक्षेप घेतल्यावर ते काम थांबवण्यात आले होते. हा देखील प्रशासनाचा खोडसाळपणा आहे.

**- ऋषिकेश शेटे**

# ...खऱ्या अर्थाने आधार हरपला

## माजी मंत्री धनंजय मुंडे; जगताप कुटूंबियांची घेतली भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : विधान परिषदेचे माजी आमदार, ज्येष्ठ नेते आणि सर्वसामान्यांच्या सुखदुःखात कायम पाठीशी असलेले स्व. अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांची राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांत्वनपर भेट घेतली.

स्व. अरुणकाका यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मुंडे यांनी त्यांना आदरांजली वाहिली. भेटीदरम्यान वातावरण अत्यंत भावनिक झाले होते.

याप्रसंगी आ. संग्राम जगताप, उद्योजक राजेश भंडारी, सामाजिक कार्यकर्ते सत्यम गुंदेचा यांच्यासह अनेक स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

धनंजय मुंडे यांनी श्रद्धांजली व्यक्त करताना भावनिक होत सांगितले, अरुणकाका हे आमच्यासाठी केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर ते एक आपुलकीने भरलेले, प्रेमळ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व होते. अनेक प्रसंगी त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि पाठबळाचा अनुभव आम्ही घेतला. त्यांच्या जाण्याने आम्ही एक आधारवड गमावला आहे. त्यांच्या आठवणी आणि शिकवण आमच्यासोबत सदैव राहील. या भेटीदरम्यान मुंडे यांनी खास करून आ. संग्राम जगताप यांची आस्थेने विचारपूस केली. संपूर्ण कुटुंबाला धीर देताना, त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांच्याशी असलेली आत्मीयता अधोरेखित केली.



### जिल्हा एका कणखर नेतृत्वाला मुकला

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मोठी पोकळी, स्व.अरुण काका जगताप हे केवळ राजकारणापुरते सीमित नव्हते. जिल्ह्यातील विविध सामाजिक कार्यांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. त्यांच्या कार्यशैलीत दूरदृष्टी, शिस्त आणि माणसांशी जोडणारी आपुलकी होती. त्यामुळेच त्यांच्या निधनाने केवळ कुटुंबीय नाही, तर पूर्ण जिल्हा एका कणखर नेतृत्वाला मुकला आहे, अशी भावना माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली.

# वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज

## प्राचार्य बोर्डे; डॉ.पाउलबुधे कॉलेजमध्ये वृक्षरोपण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सध्या ऋतुमानात दिवसेंदिवस बदल होत चालला आहे. आता कोणतेही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस पडताना दिसत आहे. यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. त्याचा परिणाम मनुष्याच्या जीवनावर होत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी केले.

पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन नारायण डोह येथे डॉ. एन. जे. पाउलबुधे पॉलिटेक्निक कॉलेज मधील रोपवाटीकेत वृक्षरोपण करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी वृक्षरोपण व संवर्धन काळाची गरज कशी आहे, याबाबत विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी ग्रीन क्लबचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र देशपांडे यांनी वृक्ष लागवड व जागतिक पर्यावरण यावर माहीती देउन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रबोधन केले.

याप्रसंगी अकॅडेमिक इनचार्ज व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश कक्षाच्या सुविधा सेंटरचे प्रमुख प्रा. जाबीर अली यांनी देखील वृक्षरोपणाचे महत्व विशद करून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रवेश प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. एन. जे. पाउलबुधे पॉलिटेक्निकमधील या सुविधा सेंटरचा विद्यार्थी व पालकांनी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

### पॉलिटेक्निकची प्रवेश प्रक्रिया २० मेपासुन सुरू

तंत्रशिक्षण संचालनायाचे पॉलिटेक्निक हे कमी खर्चात व कमी वेळेत विद्यार्थ्यांना नोकरी मिळवुन देणारे बहु आगामी तंत्रशाखा आहे. पॉलिटेक्निकची प्रवेश प्रक्रिया २० मे पासुन सुरू झालेली असुन नाव नोंदणी व फॉर्म निश्चिती दि.१६ जुनपर्यंत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या फॉर्ममधील त्रुटी व तक्रार निवारण दि. १९, २०, २१ जुनपर्यंत करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# शेडनेट प्रकल्पातून विद्यार्थी करणार रोपांची निर्मिती

## डॉ. सुस्मिता विखे पाटील यांची संकल्पना; प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे ज्ञान प्रात्यक्षिकातून मिळावे म्हणून संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेडनेटच्या माध्यमातून रोपांचे उत्पादन तयार करण्याचा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच मिळावे या उद्देशाने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून या शेडनेट शेती प्रकल्प सुरू



करण्यात आला आहे. संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पातून रोपांची निर्मिती करून शेतकऱ्यांच्या बांधापर्यत पोहचविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना शेडनेट, पॉलिहाऊस मधील संरक्षित शेती बरोबर नवीन तंत्रज्ञान प्रत्यक्ष कृतीतून आणि त्यांच्या प्रायोगिक ज्ञानातून शिकता यावे विचाराने संस्थेने भव्य स्वरुपातील शेडनेटची उभारणी केली. मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात येणार असून, नव्याने उभारण्यात आलेल्या शेडनेट हाऊस मध्ये ढोबळी मिरची, रंगीत ढोबळी मिरची, झुकिनी आणि झेंडू लागवडीचा शुभारंभ प्रा. डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, प्राचार्य प्रा. दिलीप महाले, डॉ. निलेश दळे, डॉ. आशिष क्षीरसागर, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील हायटेक प्रकल्पाची माहिती देत विद्यार्थी, प्राध्यापक आणि संस्थेतील कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना चांगला दर्जेदार भाजीपाला, फळबाग, त्याचबरोबर फुलझाडांची रोपे संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून देईल. शेतकऱ्यांना आपल्या शेतीमध्ये घेत असलेल्या वेगवेगळ्या पिकांचे तंत्रज्ञान हे प्रत्यक्ष कृतीतून बघता येणार आहे.

**- डॉ. उत्तमराव कदम**

प्रवरेच्या माध्यमातून विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतांना तो तंत्रज्ञानाभिमुख असला पाहिजे. या दृष्टीने प्रत्येक महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्या शिक्षणासोबतच त्यांना वेगवेगळे कौशल्य प्रदान केले जाण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील यातून भविष्यामध्ये रोजगार निर्मिती आणि आपल्या आवडीच्या क्षेत्रात त्यांना करिअर करता येणार आहे. ज्या विषयात शिकले त्याचे सखोल ज्ञान त्यांना मिळून त्याचा उपयोग ते आपल्या व्यक्तिगत व्यवसायासाठी समाजासाठी करू शकतात.

**- डॉ. सुस्मिता विखे पाटील**

# जामखेडमध्ये शिवराज्याभिषेक उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तहसील पटांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पहाटेच्या वेळी तिथीनुसार शिवराज्याभिषेक पूजा अतिशय उत्साह पूर्ण वातावरण मध्ये संपन्न झाला. तर दुपारी तीन वाजता छत्रपती शिवाजी महाराज मार्केट गणपती आरती संपन्न होऊन छत्रपती शिवाजी महाराज मूर्तीचे पूजन करण्यात आले.



मिरवणुकीची सुरुवात पहलगाम हल्ल्याचा बदला ऑपरेशन सिंदूर भारतीय सेनेने राबवून पाकिस्तान वर २५ मिनिटात १५ ब्रह्मोस मिसाईल डागले सर्व महत्त्वाचे इयर बेस्ट नष्ट करून केले या भारतीय शौर्याला मानवंदना देण्यासाठी शिवराज्याभिषेक समितीच्या वतीने ब्रह्मोस मिसाईल हुबेहूब साकारले याचे लोकार्पण आजी-माजी सैनिकांच्या हस्ते करून भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, प्रभू श्रीरामचंद्र, हनुमान, भगवान शंकर, विठ्ठल मूर्ती,ज्ञानेश्वर महाराज, बाजी प्रभू देशपांडे, मराठा आरमार देखावा, यांच्या भव्य मूर्ती होत्या. या भव्य मोर्चा पाहून जामखेड कर यांचे डोळ्याचे पारणे फिटले, अशी भावना जामखेड करून व्यक्त केली.केरळमधील नाद स्वरम वाद्य पथक, उत्तर प्रदेश मधील डमरू पथक, पंजाबी ढोल पथक या पथकांद्वारे विविधतेतून एकात्मतेचे दर्शन जामखेड मध्ये पहावयास मिळाले. तसेच अश्वपथक, नंदी बैल, ढोल पथक, हलगी पथक, लाठीकाठी शस्त्र पथक, मुलींचा रोप मल्लखांब पथक, तुतारी पथक या सर्व पथकांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

### होळकरांसह शिवरायांचा पुतळा उभारावा

मिरवणुकीत हजारोंच्या संख्येने माता भगिनी, तरुण युवक शिवभक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले. भव्य मिरवणुकीचा समारोप लक्ष्मी चौक संविधान स्तंभ या ठिकाणी करण्यात आला. यावेळी श्री शिवप्रतिष्ठान तालुका अध्यक्ष पांडुरंग भोसले यांनी मनोगतात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक व छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा जामखेडमध्ये उभारावा, अशी सर्व शिवभक्तांची मागणी आहे.

# अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** एका गावात एका अल्पवयीन मुलीला लग्न करण्यासाठी फुस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. ही घटना शनिवारी (७ जून) सायंकाळी ७.३० वाजता घडली. फिर्यादी यांच्या घरासमोरून संशयित आरोपींनी संगणमत करून फिर्यादींच्या अल्पवयीन मुलीला (वय १७) फूस लावून पळवून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# गर्दीचा फायदा घेवून सोने केले लंपास?

## श्रीरामपुरातील तीन महिला चोरट्यांना वैजापूर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर बसस्थानकावर एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या तिघी महिला आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना २९ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली होती.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी महिलांची नावे गीता संतोष बन्सी, कांताबाई कमल लोंढे व माला कॅप्टन लोंढे अशी आहेत. आरोपी महिला श्रीरामपूर येथील असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या महिलांनी बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत पीडितेच्या गळ्यातील सोन्याचे नेकलेस आणि मोहनमाळ चोरी केली. चोरी झालेल्या दागिन्यांची अंदाजे किंमत २०,६०० रुपये असून, पोलिसांनी हे दागिने हस्तगत केले आहेत.या प्रकरणाचा तपास डीवायएसपी भागवत फुंदे, पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सीमा तुळशीराम जाधव या करत आहे. आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरू आहे.

### नागरिकांनी, गर्दीच्या ठिकाणी सावध रहा

स्थानिक नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले असून, महिलांवर होणाऱ्या अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक उपाययोजना राबवण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# दगू गावंडे काळाच्या पडद्याआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील दगू गावंडे



यांचा हृदयविकाराने काल निधन झाले. दगू गावंडे (ग्रामपंचायत शिपाई) व धार्मिक कार्यात (श्रीक्षेत्र गोळवाडी ते श्रीक्षेत्र पैठण) दरवर्षी दगू आप्पा गावंडे हे चोपदार म्हणून दिंडीची सेवा करायचे. तसेच दरवर्षी दक्षिणमुखी हनुमान मंदिर व श्री ओंकारेश्वर महादेव मंदिर यांच्या वर्धापनादिना निमित्ताने गावामध्ये सप्ताह होतो.

# मुलांना सायबर गुन्हेगारीपासून वाचवा

## द ग्रोव्हिंग इयर कार्यक्रमातून सुसंवाद; तज्ज्ञ पालकांशी साधणार संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**


**अहिल्यानगर :** पाल्य आणि पालक यांच्यातील जिव्हाळ्याचे संबंध घट्ट होण्यासाठी शहरातील पास अकॅडेमीच्या वतीने पालकांसाठी मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बदललेल्या सामाजिक परिस्थितीमुळे व सोशल मीडियाच्या अतीवापरामुळे पालकांना व विद्यार्थांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे कौटुंबिक, सामाजिक व शालेय संगोपनात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी या कार्यशाळेत तज्ञांशी खुला संवाद आयोजित केला आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले आहे.

सदर द ग्रोव्हिंग इयर हा कार्यक्रम दि. १५ जून २०२५ रोजी संध्याकाळी ५: ३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमात आचार-विचारात सकारात्मकता आणने, अभ्यासात रुची वाढवणे, अवधानाचे केंद्रीकरण करणे, आंतरक्रियेतून अध्ययन इत्यादी सकारात्मक विषयांवर व मुलांमध्ये वाढत चाललेल्या मोबाईलचे व्यसन, मुलांकडून पालक व शिक्षकांचा अवमान, विध्यार्थांची बेशिस्त, गैरवर्तन, न ऐकणे, अभ्यासाकडे दुर्लक्ष, अंधानुकरण, खाद्य संस्कृतीतील बदल आदी विषयांवर तज्ञ थेट पालकांशी संवाद साधणार असून अनेक प्रश्नांची उकल करणार आहेत.

सायबर क्राईम, विद्यार्थ्यांमधील गुन्हेगारी या विषयांवर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे समुपदेशन करणार आहेत. त्यांनी भावनिक बुद्धिमत्ता या विषयावर अनेक प्रशिक्षण शिबीर घेतली आहेत. तसेच देशभरात ५०० हून अधिक पोलिसांना भावनिक बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण दिलेले आहे.

त्यांच्या या अनुभवाचा पालकांना फायदा होणार आहे. जीवन कौशल्ये, बालकांच्या संगोपनात पालकांची भूमिका या विषयांवर मानसशास्त्रीय तज्ञ नयना डीन्नी ह्या पालकांशी थेट संवाद साधणार आहेत.

नयना डीन्नी ह्या सुप्रसिद्ध जीवन प्रशिक्षक आणि मानासशात्रीय तज्ञ असून त्यांनी आत्तापर्यंत आपल्या भावना व आपली कर्तव्य या मध्ये सुसंवाद साधण्यासाठी ७०० हून अधिक लोकांना प्रशिक्षण व समुपदेशन केलेले आहे.



### तज्ञ पालकांच्या प्रश्नांना प्रत्यक्ष उत्तर देणार

गेली एकवीस वर्ष त्यांच्या जवळ शिक्षक प्रशिक्षक व विभाग प्रमुख म्हणून अनुभव आहे. त्या नगर शहरात शासन नियुक्त स्वच्छता दूत म्हणूनही कार्यरत आहेत. बालकांची शैक्षणिक वाटचाल व पालकांच्या अपेक्षा यावर प्रा. डॉ. भांडारकर प्रकाश टाकणार आहेत. या सर्व तज्ञ पालकांच्या प्रश्नांना प्रत्यक्ष उत्तर देणार आहेत.

# सण, उत्सव साजरे करताना संस्कृतीचे जतन करा

## भाऊ बारस्कर; बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली अनाथ आश्रमात फळे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** समाजामध्ये आपण वावरत असताना समाजाचे आपण काहीतरी देणे लागते या भावनेतून प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासावी. सण, उत्सव, वाढदिवस साजरे करीत असताना आपल्या संस्कृतीचे जतन होईल असे कार्य करावे, अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी व दैनंदिन जीवन जगण्यासाठी आर्थिक मदतीची खरी गरज



असते ती पूर्ण करण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे आले पाहिजे, या माध्यमातून गरजूवंत विद्यार्थी समाजातील मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी मदत होईल, असे प्रतिपादन भाऊ बारस्कर यांनी केले.


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील माळेगाव बनेश्वर येथील माऊली अनाथ आश्रम मधील विद्यार्थ्यांना फळे व मिष्टान्न वाटप करण्यात आले यावेळी उद्योजक भाऊ बारस्कर, राष्ट्रवादी शहर जिल्हा उपाध्यक्ष नितीन घोडके, जालिंदर वाल्हेकर, हभप गोरक्षनाथ दुतारे महाराज, राजेंद्र कुंभार, राष्ट्रवादी महिला उपजिल्हाध्यक्ष सुनिता वाल्हेकर, हभप नवनाथ महाराज लिम्हण आदी उपस्थित होते.

आपली भूमी ही संत महंतांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. त्यांच्या विचारामुळे आपल्याला महान संस्कृती लाभली आहे. तिचे जतन करण्यासाठी विविध धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणे गरजेचे आहे, संपत बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली अनाथ आश्रमात येऊन वाढदिवस साजरा केला आहे, ही बाब कौतुकास्पद आहे.

# कर्जतच्या कवळेंची मंत्रालयात उपसचिवपदी पदोन्नती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जवळके :** कर्जत तालुक्यातील नागलवाडी येथील मूळ रहिवासी



असणारे व सध्या मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागात अवर सचिव म्हणून कार्यरत असणारे आबासाहेब आत्माराम कवळे यांना महाराष्ट्र शासनाने नुकतीच आवर सचिव पदावरून उपसचिव पदावर पदोन्नती देऊन विधी व न्याय विभागात पदस्थापना दिली आहे.

मंत्रालयात महसूल विभागात कार्यरत असताना महसूल विभागामार्फत नागरिकांना दिले जाणारे सर्व प्रकारचे दाखले, प्रमाणपत्र यांच्या कार्यपद्धतीचे सुलभीकरण, अद्यावतीकरण व प्रमाणीकरण, तसेच शासनाच्या सुवर्ण जयंती राजस्व अभियान कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणीत महत्त्वाचा वाटा होता.तसेच आबासाहेब कवळे यांनी भारत निवडणूक आयोगाअंतर्गत ईव्हीएम-व्हीव्हीपॅट यंत्रांकरिता महाराष्ट्राचे समन्वय अधिकारी म्हणून सुमारे ५ वर्ष अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सामान्य प्रशासन विभागात भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या आस्थापनेवर काम करताना कवळे यांनी सर्व भाप्रसे अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकाचे संगणकीकरण (ई सेवा पुस्तके) व सर्व शासकीय-निम-शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची सेवानिवृत्ती प्रकरणे जलद गतीने अंतिम करण्याकरिता प्रचलित कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करणे याबाबत उल्लेखनीय काम केले आहे.

### कवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन

राज्यातील ग्रामीण भागातील छोट्याशा खेड्यातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेऊन आबासाहेब कवळे यांनी हे यश संपादन केले असल्याने ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता प्रेरणादायी आहे. त्यामुळे आबासाहेब कवळे यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# रस्त्यांच्या प्रश्नांवरून शेतकरी कृती समिती आक्रमक

## तहसीलदारांना तातडीची बैठक घेण्याची आ. प्रशांत बंब यांच्या सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** शेतकरी कृती समितीच्या वतीने महेश गुजर



यांनी गंगापूर मतदारसंघाचे आ. प्रशांत बंब यांना सविस्तर माहिती देवून गाव नकाशामध्ये दाखवलेले शिव पानद, सार्वजनिक वहिवाटीचे रस्ते, तसेच नदी-नाले यावर झालेल्या अतिक्रमणांविषयी सविस्तर माहिती दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून शेकडो शेतकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयात अतिक्रमणासंबंधी तक्रारी दाखल केल्या असून, या प्रकरणांवर अद्याप कार्यवाही झालेली नाही. काही शेतकऱ्यांनी वैयक्तिक किंवा जाणीवपूर्वक सार्वजनिक रस्ते अडवून अतिक्रमण केल्याने अन्य शेतकऱ्यांना शेतीसाठी रस्ते वापरणे कठीण झाले आहे. शासनाच्या स्पष्ट निर्दे शांनुसार तहसीलदारांनी गाव नकाशातील रस्त्यांची सीमा निश्चित करून भू-अभिलेख विभागाच्या मदतीने खुणा करून रस्ते मोकळे करणे अपेक्षित आहे.

मात्र, या प्रकरणांवर अनेक वर्षांपासून दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांना तहसील कार्यालयाचे वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यातच काही वकील व सरकारी कर्मचारी या प्रकरणांत विलंब करत असल्याचेही आरोप करण्यात आले आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, शेतजमीन मोजणी शुल्क फक्त २०० रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे. तसेच, अतिक्रमणग्रस्त रस्ते काढण्यासाठी पोलिस प्रशासनाने तात्काळ मदत करावी, असे निर्देश दिले आहेत.

या निर्णयाचा लाभ गंगापूर तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल, भू-अभिलेख व पोलिस प्रशासनाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात यावे, अशी विनंती शेतकरी कृती समितीने आ. प्रशांत बंब यांच्याकडे केली होती. त्यांनी दि. १० जून २०२५ रोजी गंगापूर तहसील कार्यालयात तातडीने बैठक घेण्याचे आदेश दिले आहेत.

ज्यांनी याआधी अतिक्रमणासंबंधी तक्रारी दाखल केल्या आहेत. त्यांनी बैठकीच्या दिवशी गाव नकाशा व तक्रार अर्जासह उपस्थित रहावे, असे आवाहन शेतकरी बांधवांना करण्यात आले आहे.

# ऊस वाढीसाठी 'एआय' तंत्रज्ञानाचा होणार वापर

## माजी केंद्रीय मंत्री शरद पवार; श्रीरामपुरात केले वक्तव्य; कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतकऱ्यांची उपस्थिती

आपल्याकडे ऊसाला साधारणतः १० ते १२ कांड्या येतात, तोच ऊस एआय तंत्रज्ञानाचा वापर करून केल्यास त्या ऊसाला २२ ते २५ कांड्या येतात. ३० टक्के कमी पाणी, ३० टक्के कमी खर्च, ३० टक्के जादा उत्पादन या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शक्य आहे. हे फक्त ऊसच नाहीतर इतर पिकांसह फळ बागांनाही होऊ शकतो. राज्याचे कृषिमंत्री अर्थमंत्री यांच्या सोबत वसंत दादा शुगरमध्ये बैठक घेऊन सरकारला या तंत्रज्ञानावर काम करायचे सुचवले आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) तंत्रज्ञानाचा वापर आता सर्वच क्षेत्रात होत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर कृषी क्षेत्रात होण्यासाठी वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूटने राज्यातील साखर कारखानदारांची बैठक घेऊन ऊस उत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापराबाबत चर्चा झाली. ऊस वाढीसाठी या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास निश्चितच फायदा होईल, असे मत माजी केंद्रीय कृषी मंत्री खासदार शरद चंद्र पवार यांनी व्यक्त केले.

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे जयंती व ज्युनिअर कॉलेजच्या नूतन वास्तूच्या उद्घाटन व पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौशल्य सदस्य रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी, खासदार निलेश लंके, राष्ट्रवादी



काँग्रेसचे महासचिव अविनाश आदिक, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौशल्य सदस्य मीनाताई जगधने, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गटाचे) अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके,रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग प्रमुख अरुण कडू पाटील आदी उपस्थित होते.

खासदार शरद पवार म्हणाले की, रावसाहेब शिंदे व माजी केंद्रीय कृषिमंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्याशी कौटुंबिक संबंध होते. देशाचे कृषिमंत्री असताना अण्णासाहेब शिंदे यांनी कृषी क्षेत्रासाठी मोठे योगदान दिले आहे. रावसाहेब शिंदे यांनी अनेक वर्ष रयत शिक्षण संस्थेमध्ये काम केले आहे. त्यांच्या मुलांनी उभे केलेले काम लहानशा रोपट्याचे रूपांतर मोठ्या वृक्षांमध्ये होईल, अशा सदिच्छा यावेळी दिल्या.

महाराष्ट्र सरकारने एक निर्णय घेतला आणि ५०० कोटीची तरतूद या तंत्रज्ञानासाठी केली आहे. हे तंत्रज्ञान हे गेमचेंजर आहे. यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आव्हान यावेळी खा. शरदचंद्र पवार यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे प्रस्तावित डॉक्टर राजू शिंदे यांनी केले. स्वागत डॉक्टर प्रेरणा शिंदे तर सूत्रसंचालन डॉक्टर बाबुराव उपाध्ये, आभार रोहित शिंदे यांनी केले.

# नागरी समस्यांबाबत मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागातील नाली साफ सफाई, डास फवारणी व तणनाशक फवारणी स्ट्रीट लाईट व रस्त्याच्या समस्यांबाबत भाजपच्या कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या दिला.

राहुरी येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांना आज निवेदन देण्यात आले. नगरपरिषद हद्दीत पावसाळ्यापूर्वी जेसीबीने गाळ काढण्यात आला होता. पण जेसीबी ने तो गाळ पूर्णपणे काढण्यात आला नव्हता. काढलेला गाळ पावसामुळे पुन्हा तो नाल्यांमध्ये जावून नाल्या तुंबल्या आहेत. कर्मचाऱ्याच्या मदतीने गाळ काढण्यात यावा. तसेच शहरात डासांचे प्रमाण वाढून रोगराई पसरत आहे. नगरपालिके मार्फत अद्यापपर्यंत रोगराई प्रतिबंधक फवारणी केलेली नाही.

शहरामध्ये वाढलेल्या गवतांवर तणनाशक फवारणी अद्याप पर्यंत केली नाही. खूप मोठ्या प्रमाणात तण वाढले असून त्यापासून साप, विंचू यांचे धोका निर्माण झालेला आहे. शहरातील कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या, कचरा उचलणारे टॅम्पो यांचेद्वारे उचलला जाणारा कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे नागरीक त्रस्त झाले असून कचरा रस्त्यावर फेकला जातो. तसेच नगरपरिषद हद्दीत व ग्रामीण भागात लावलेले स्ट्रीट लाईट हे वारंवार रिपेअर करुन देखील दिवसा चालू व रात्री



येत्या आठ दिवसांत सर्व समस्या मार्गी न लागल्यास भाजपच्या वतीने तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी माजी उप नगराध्यक्ष आर. आर. तनपुरे, भाजप-चे राहुरी मंडळाधक्ष विक्रम भुजाडी, संभाजी तनपुरे ,गणेश खैरे, सचिन मेहेत्रे, किशोर येवले, सतीश फुलसौंदर, राजेंद्र उंडे, राम शिंदे, अजित डावखर, अक्षय तनपुरे, झिशान शेख, दत्तू गायकवाड, दिनेश उंडे, सागर येवले, काकासाहेब आढागले माजी नगरसेवक आदि उपस्थित होते. मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी निवेदन स्विकारले.

बंद अवस्थेत आढळून आलेले आहेत. नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईट ही पूर्णपणे बंद आहेत. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्था व तसेच रस्त्यावर साठणाऱ्या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यात यावी आदी समस्या बाबत राहुरी येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या मांडून समस्यांचा पाढा वाचला.

# जिल्ह्यात जलताराचे केवळ १६ खड्डे

## रोहयोतून शेतकऱ्यांना करावी लागते नोंदणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जलतारा अभियानांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात केवळ १६ जलतारा शोषखड्डे पूर्ण झाले आहेत. जलतारा अभियानाच्या माध्यमातून शोषखड्डे खोदून पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे, भूजल पातळी वाढविणे आणि रेनवॉटर हार्वे स्टिंगद्वारे जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याचे उद्दिष्टे आहे. जिल्ह्यात मात्र सदर योजनेबाबत जागृती नसल्याने शेतकरी योजनेपासून



वंचित आहेत. शेतातील जलस्तर वाढावा, यासाठी शेतकऱ्यांना शोषखड्डे खोदण्यासाठी प्रवृत्त करण्याची आवश्यकता आहे.

जलतारा योजना ही मनरेगाअंतर्गत राबविली जाणारी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात ५ फूट रुंद, ५ फूट लांब आणि ६ फूट खोल खड्डा (शोषखड्डा) खोदून, तो मोठ्या दगडांनी भरून पाठसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी लागते. यामुळे भूजल पातळी वाढते आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणीही उपलब्ध होते. या योजनेचा लाभघेणाऱ्या शेतकऱ्यांना ५ हजार ६०० रुपये अनुदान मिळते. रा-हाता तालुक्यात एक आणि संगमनेर तालुक्यात १५ शोषखड्डे खोदण्यात आले आहेत. जलतारा योजनेसाठी गावातील ग्रामपंचायत कार्यालयाकडे अर्ज करता येतो. ही संपूर्ण प्रक्रिया मनरेगाअंतर्गत राबविली जाते. शेतकरी त्यांच्या शेतात जलतारा खड्डा तयार करून अर्ज करू शकतात.

### नोंदणी कुठे करायची ?

ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामसेवक, कृषी सहायक किंवा रोजगार सेवक यांच्याकडे संपर्क साधावा. जलतारा योजनेतून पावसाचे पाणी जमिनीत मुरवले जात आहे. विहिरी, हॅण्डपंप आणि बोअरवेलमध्ये पाण्याचा साठा टिकविण्यात मदत होईल.

# अयोध्येत होणार हिंदी ज्ञानेश्वरी पारायण

## देवगड येथे नियोजन बैठकीत विविध निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** श्री. संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे १९ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हिंदी भाषेतील सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या पारायण महोत्सवाचे आयोजन बालयोगी सदानंद महाराज पारायण महोत्सव समिती आणि अखिल वारकरी भाविक यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे.

या महाआयोजनासाठी देवगड येथील श्री. दत्त देवस्थान येथे ९ जून रोजी नियोजन बैठक पार पडली. यावेळी पूजनीय भास्करगिरी महाराज, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत धर्माचार्य संपर्क प्रमुख ह.भ.प. माधवदास राठी महाराज, क्षेत्र संघटन मंत्री गोविंद शेंडे, क्षेत्रीय धार्मिक



पुंज प्रमुख संजय मुरदाळे, सहप्रमुख नागनाथ बोंगरगे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या बैठकी नंतर दत्त देवस्थान व पैस खांब (ज्ञानेश्वरी लिखाण स्थळ) चे सर्वांनी दर्शन घेतले. यावेळी पर्यावरणपूरक पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंडीचे नियोजन व माहितीही देण्यात आली. या बैठकीला वारकरी संप्रदायाचे चंद्रकांत कदम, नाना डौले, विहिंप मंत्री सुनील खिस्ती, जिल्हा पालक विश्वनाथ नाणेकर, विशाल वाकचौरे, तालुका अध्यक्ष डॉ. अविनाश काळे, डॉ. शिंदे, प्रशांत बहिरट, बजरंग दल जिल्हासंयोजक शुभम मुर्तडक, सोनभाऊ परदेशी गणेश मुरदारे, आदित्य वाघ आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नेवासा येथे विहिंपच्या पदाधिकाऱ्यांची व हितचिंतकांची स्वतंत्र बैठक झाली. यामध्ये संघटनवाढ, बालसंस्कार, नैतिक शिक्षण, गोसंवर्धन, सेंद्रिय शेती आदी विषयांवर सखोल चर्चा झाली. गो-आधारित शेती व त्यातून मिळणाऱ्या उत्पादनाची मागणी लक्षात घेऊन शेतकऱ्यांना यासाठी प्रशिक्षण व जनजागृती करण्याचे आवाहन केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रभाकरराव शिंदे यांनी केले.

# थोरात यांच्यामुळे मुळा नदीवर बंधारे

## नवीन लोकप्रतिनिधींनी अभ्यास करावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** पठार भागाला वरदान ठरणाऱ्या मुळा नदीवर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून ठिकठिकाणी केटीवर व बंधारे बांधण्यात आले आहे. मोरवाडी धरणासाठी ही त्यांचा सातत्याने पाठपुरावा राहिला आहे. नवीन लोकप्रतिनिधीने अगोदर तालुक्यातील गावांचा अभ्यास करून बोलले पाहिजे, असे मत संगमनेर तालुका असंघटित कामगार संघटनेचे अध्यक्ष जयराम ढेरंगे यांनी व्यक्त केले आहे.

ढेरंगे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, नवीन लोकप्रतिनिधींना अजून गावे माहिती नाही. काम माहिती नाही. फक्त हे करणार ते करणार या घोषणाबाजी सुरू आहेत. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी गावोगावी विकासाच्या योजना राबवल्या आहेत.



पठार भाग अनेक वर्ष अकोले विधानसभा मतदारसंघाला जोडलेला होता. तरीही या भागात विकासाच्या योजना ह्या माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनीच राबवल्या. याचबरोबर मुळा नदीवर ठिकठिकाणी केटीवर व बंधारे बांधून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिली. मोरवाडी धरणासाठी ही त्यांनीच पाठपुरावा केला. २००४ ला माजी मंत्री बाळासाहेब थोरात कृषी मंत्री होते त्यावेळेस सध्याचे जलसंपदा मंत्री ही मंत्री होते.

समन्यायी पाणी वाटपाला विरोध हा पहिला माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केला तर संगमनेर मधून तीव्र मोठे आंदोलन करत निषेध नोंदवला यावेळी सध्याचे मंत्री गप्प बसून होते.नवीन लोकप्रतिनिधींना काही लोक चुकीची माहिती देत असून त्यांनी अगोदर तालुक्याचा अभ्यास करावा गावोगावी भेट द्यावा मगच जाहिरात बाजी करावी असा टोलाही त्यांनी लगावला.

# साहेबराव घाडगे यांच्यावर अंत्यसंस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत साश्रू नयनांनी नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती शैक्षणिक सैनिकी संकुलाचे संस्थापक श्री साहेबराव घाडगे पाटील यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अमर रहे...अमर रहे..., घाडगे पाटील साहेब...अमर रहे..अशा घोषणेने त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचा परिसर दुमदुमला होता.

मुंबई येथून पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घाडगे पाटील यांचे पार्थिव त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात आणल्यानंतर सकाळी ८ ते १० यावेळेत अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आले.घाडगे पाटील यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतांना विद्यार्थी,पालक,कामगार,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हंबरडा फोडतांना दिसत होता.




सदरचे पार्थिव फुलांनी सजविण्यात आलेल्या रथात ठेवण्यात आले होते त्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात येथील मुख्य क्रीडांगण असलेल्या मैदानावर आणण्यात आले.याठिकाणी बनविण्यात आलेल्या स्मारकावर पार्थिव ठेवण्यात आले.यावेळी एनसीसी कॅडेटच्या वतीने सलामी देत मानवंदना देऊन पुष्प चक्र अर्पण करण्यात आले. घाडगे पाटील यांची कन्या स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील यांनी पार्थिवास अग्निडाग दिला.

यावेळी माजी मंत्री शंकरराव गडाख परिवाराच्या वतीने सुनीताताई गडाख,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील परिवाराच्या वतीने सुनीलभाऊ लंघे पाटील,ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने माजी आमदार पांडुरंग अभंग,काशिनाथ अण्णा नवले,माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे,भाजपचे विधानसभा अध्यक्ष सचिन देसरडा आदी उपस्थित होते.

# 'पठारभागातील पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तालुक्यातील साकूर पठार भागातील दीर्घकाळ प्रलंबित सिंचनाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी जल संपदा विभागाने बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय समोर आणला आहे. या माध्यमातून साकूर पठाराचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असून, गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यावाचून वंचित असलेल्या भागाला दिलासा मिळणार आहे, अशी माहिती आमदार अमोल खताळ यांनी शासकीय विश्राम गृहावर आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच मुंबई तील मंत्रालयामध्ये संगमनेर तालुक्यातील जलसंपदा विभागाच्या कामासंदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीला आमदार अमोल खताळ, तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, रौफ शेख, सरपंच रवी दातीर, अमित धुळगंड यांच्यासह शिष्टमंडळ उपस्थित होते. या आढावा बैठकीमध्ये साकुर पठार भागातील पाण्याच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली.

आमदार खताळ म्हणाले, संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील मोरवाडी धरणासंदर्भात अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांची मागणी होती. या आधी भूसंपादनही झाले होते, मात्र धरण न झाल्याने शेतकऱ्यांना जमीन परत देण्यात आली होती. तात्कालीन पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी न्यायालयाला पत्र देऊन जायकवाडीच्या खाली कुठलेच धरण होणार नाही असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते मात्र साकुर पठार भागाचा पाणी प्रश्न कोणत्याही परिस्थिती मध्ये सोडवायचा आहे यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आग्रह धरला आहे.

# जामखेड तालुक्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

## खर्डा परिसरात २० घरांची पडझड, वीजपुरवठा ठप्प

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** तालुक्याला सलग पाचव्या दिवशी वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. सोमवारी सायंकाळी सातच्या सुमारास अचानक आकाश ढगांनी व्यापले आणि काही क्षणातच वातावरणाने रौद्ररूप धारण केले. विजांच्या कडकडाटासह आलेल्या जोरदार वाऱ्यांनी नागरिकांची झोप उडवली, तर पावसाने खर्डा, जवळा, नान्नज, बोर्ले, मोहरी, जातेगाव, दिघोळ, कवडगाव व लोणी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले.

खर्डा गावात वादळामुळे २० घरे कोसळली असून अनेक घरांवरील पत्रे उडून गेले आहेत. कवडगाव येथे झालेल्या जोरदार पावसामुळे घराची भिंत पडून पद्मिनी शेवाळे जखमी झाल्या. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडले. वीजखांब कोसळल्याने संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला. विद्युत यंत्रणा कोलमडल्यामुळे रात्रीच्या अंधारात नागरिकांना अनेक



अडचणींचा सामना करावा लागला.

परिसरामध्ये सोसाट्याचा वारा व विजांचा गडगडाटाने पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच पावसाने रुद्रावतार धारण केल्याने मोठमोठे झाडे उन्मळून पडली. खर्डा, तरडगाव आणि राजुरी येथील ३३ केव्ही फिडर पूर्णपणे बंद अवस्थेत आहेत. शेतकऱ्यांच्या फळबागा उन्मळून पडल्या आहेत.

मागील दोन दिवसांपासून शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी सुरू केली होती. मात्र रात्रीच्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतजमिनी अनेक बांध फुटून शेतीतील माती वाहून गेली असून पेरण्या वाया गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा तत्काळ पंचनामा करून नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून आणि नागरिकांकडून केली जात आहे.

# पत्रकार भोकरेंना जीवे मारण्याची धमकी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांना जिवे मारण्याची मिळालेली धमकी व पत्रकार सचिन तोडकर यांचेवर वृत्तांकन करताना झालेल्या हल्ल्याच्या निषेध करत, आरोपींवर कठोर कारवाई करावी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांनी केली आहे.

प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांनी वृत्तपत्रातून लेखन करताना असे म्हटले होते की, पाकिस्तान मधील क्रिकेट खेळाडू जसे पाकिस्तानवर प्रेम दाखवतात तसेच प्रेम बॉलीवूडमधील अभिनेते खान बंधू हे आपल्या देशाबद्दल उपडपणे भारत प्रेम का दाखवत नाही ? आपण देखील भारताच्या बाजूने खंबीरपणे उभे आहोत, असे खान बंधूंनी देखील देशप्रेम दाखवायला हवं होतं , असे वृत्त प्रसिद्ध होताच काही अज्ञात इसमांनी निनावी पत्राद्वारे, तू ८ दिवसात माफी माग, अन्यथा तुला गोळीबार करून उडवून देऊ, अशी धमकी दिली आहे.

या धमकीचा राज्य पत्रकार संघाच्यावतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात येत असून, राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सिद्धार्थ भोकरे यांना पोलिस संरक्षण देऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी राज्य पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येत आहे.

# संपादकीय

## नक्षलवादाला भीमटोला

आकडेवारीनुसार २०२५ मध्ये मारल्या गेलेल्या माओवाद्यांची संख्या १८० पेक्षा जास्त झाली आहे. गेल्या पंधरा दिवसांमध्ये सुरक्षा दलांनी बस्तर आणि आसपासच्या भागात ५६ माओवाद्यांना ठार मारल्याचा दावा केला आहे. पोलिसांनी गेल्या १५ महिन्यांमध्ये छत्तीसगडमध्ये माओवाद्यांवर जोरदार कारवाई केली. त्यात आतापर्यंत ४०० हून अधिक संशयित माओवादी मारले गेल्याचा दावा केला आहे. अलिकडेच करेगुट्टालूच्या टेकड्या, दऱ्या आणि गुहांमध्ये मोठ्या संख्येने माओवादी लपले असल्याचा अंदाज केंद्रीय आणि राज्य सुरक्षा दलांना आला. त्यानंतर या भागात मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले. या घटनेत ३१ माओवाद्यांच्या मृत्यूच्या दाव्यासोबतच सुरक्षा दलांनी माओवादविरोधी कारवाईत एकूण २१४ माओवाद्यांची लपण्याची ठिकाणे आणि बंकर नष्ट करण्यात आल्याचा दावा केला. या कारवाईदरम्यान ४०० हून अधिक आयईडी, मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली. २०२५ च्या पहिल्या चार महिन्यांमध्ये सातशेहून अधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. माओवादविरोधी कारवायांची तीव्रता आणि त्याच्याशी संबंधित सध्याच्या आकडेवारीवरून माओवादी चळवळ १९७० नंतरच्या सर्वात वाईट टप्प्यातून जात असल्याचे दिसून येत आहे. २०२० ते २०२३ या चार वर्षांमध्ये छत्तीसगडमध्ये १४१ माओवादी मारले गेले. भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये राज्याचे गृहमंत्री विजय शर्मा यांनी माओवाद्यांशी शांतता चर्चेचा प्रस्ताव ठेवला. ते त्यांच्या बहुतेक सार्वजनिक भाषणांमध्ये शांतता चर्चेचा वारंवार उल्लेख करत राहिले; परंतु दुसरीकडे राज्यातील सुरक्षा दलांनी माओवाद्यांविरुद्धची कारवाई हळूहळू तीव्र केली. दरम्यान, शहा यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवाद्यांना संपवण्याची घोषणा केली. त्यानंतर माओवादविरोधी कारवायांमध्ये अनपेक्षित गती आली. छत्तीसगडमध्ये २०२४ या एका वर्षात २८७ नक्षलवादी मारले गेले, एक हजारजणांना अटक करण्यात आली आणि ८३७ जणांनी आत्मसमर्पण केले, अशी माहिती देताना अमित शहा यांनी सुरक्षा दलाचे कौतुक केले. बस्तर परिसरात सुरक्षा दलांच्या २८ छावण्या उघडण्यात आल्या. येथे माओवादविरोधी कारवायांचा वेग कायम आहे. या काळात, राज्यात विविध सार्वजनिक संघटनांमधील लोकांना मोठ्या संख्येने अटक करण्यात आली. निष्पाप आदिवासींच्या छळाच्या बातम्याही समोर आल्या आणि अनेक चकमकींवर प्रश्न उपस्थित केले गेले; पण यामुळे सरकारी कारवाईत कोणताही फरक पडला नाही.

जानेवारी २०२२ मध्ये छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी २६ वर्षीय मनुराम नुरेती याला माओवादी ठरवून ठार मारले. घटनेच्या एका आठवड्यानंतर छत्तीसगड पोलिसांनी मान्य केले की मनुराम प्रत्यक्षात माओवादी नव्हता. सरकारकडून सुरू असलेल्या माओवादविरोधी कारवाईमध्ये सुरक्षा दलांचेही मोठे नुकसान झाले. जानेवारी २०२५ मध्ये छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात माओवाद्यांनी पेरलेल्या 'आयईडी'च्या स्फोटात आठ सुरक्षा कर्मचारी आणि एक नागरिक ठार झाला. मृतांच्या संख्येच्या बाबतीत एप्रिल २०२३ नंतरचा हा पहिलाच मोठा 'आयईडी' स्फोट होता. दंतेवाडा येथे अशाच प्रकारच्या स्फोटात 'डीआरजी'चे दहा कर्मचारी आणि एक नागरिक चालक ठार झाला होता. माओवादी संघटना निश्चितच कमकुवत झाली आहे. त्यांचे अनेक वरिष्ठ म्होरके मारले गेले आहेत आणि सुरक्षा दलांनी त्यांच्या प्रभावाचे अनेक भाग ताब्यात घेतले आहेत; परंतु माओवाद शेवटच्या टप्प्यात आहे असे म्हणणे तपासून पहावे लागेल. बंदी घातलेल्या माओवादी संघटनेचीही एक रचना आहे, एक निश्चित व्यवस्था आहे. त्यात एकाचे निघून जाणे दुसऱ्यासाठी जागा निर्माण करते. सरकारच्या मते एप्रिल २०१८ मध्ये देशभरातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या १२६ वरून ९० वर आली. जुलै २०२१ मध्ये अशा जिल्ह्यांची संख्या ७० पर्यंत होती तर एप्रिल २०२४ च्या आकडेवारीनुसार माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या फक्त ३८ वर आली. मे १९९२ मध्ये सर्वात मोठ्या माओवादी संघटनेत सीपीआय (एमएल) पीपल्स वॉर ग्रुपमधील वादांची तीव्रता वाढत होती. आंध्र प्रदेशमध्ये संघटनेवर बंदी घालून एक आठवडाही झाला नव्हता; पण संघटनेचा केंद्रीय समिती सचिव कोंडापल्ली सीतारामय्या त्याच्या सहकाऱ्यांसह वेगळी संघटना स्थापन करण्याच्या मनस्थितीत आला होता. १९८० च्या दशकात वारंगल विद्यापीठातून बी.टेक पूर्ण केल्यानंतर संघटनेत सामील झालेला नंबल्ला केशव राव याने सीतारामय्या याच्यासोबत जाण्याऐवजी 'पीपल्स वॉर ग्रुप'मध्ये राहणे पसंत केले. जून १९९२ मध्ये मुप्पल्ला लक्ष्मण राव उर्फ गणपती याला सरचिटणीस बनवण्यात आले, तेव्हा नंबल्ला केशव राव त्याचा जवळचा सहकारी झाला. नंबल्ला केशव राव याला पक्षाच्या केंद्रीय समितीमध्ये स्थान देण्यात आले. तोच ७० वर्षीय नंबल्ला केशव राव नक्षलवादी चळवळीत बसवराजू म्हणून ओळखला जात होता. तत्पुर्वी केशवने एम.टेक. साठी प्रवेश घेतला, पण त्याचा बहुतेक वेळ राजकीय कार्यात जाऊ लागला. त्याने 'सीपीआय लिबरेशन'साठी काम करायला सुरुवात केली. शिक्षण घेत असताना त्याने 'सीपीआय पीपल्स वॉर ग्रुप'साठी काम करण्यास सुरुवात केली. एकामागून एक जबाबदाऱ्या स्वीकारत त्याने संघटनेतील नेतृत्वाचा विश्वास जिंकला. प्रत्येक जबाबदारी आणि क्षेत्रासोबत केशव रावचे नाव बदलत राहिले. १९९२ मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप' कोसळण्याच्या मार्गावर असताना गणपतीसोबत राहिलेल्या केशवला केंद्रीय समितीचा सदस्य म्हणून जबाबदारी मिळाली. सरचिटणीस असलेल्या केशवची हत्या झाल्याने नक्षलवादी चळवळीला मोठा धक्का बसला. त्यामुळे ही चळवळच मोडीत निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनेकडे अनेक लोक सशस्त्र माओवादी संघर्षाच्या समाप्तीची सुरुवात म्हणूनही पाहत आहेत.

# संकटकाळात रिझर्व्ह बँकेचा मदतीचा हात

**दृष्टिक्षेप**
**– जनार्दन पाटील**

भारत आणि पाकिस्तान दरम्यानचा तणाव, अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ची भीती आणि कोरोनाच्या रुग्णांची वाढती संख्या यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण आला असताना रिझर्व्ह बँक सरकारच्या मदतीला धावून आली. तिने दोन लाख ६९ हजार लाख रुपयांचा लाभांश दिल्याने सरकारला हायसे वाटले. या निधीचा वापर सरकार कोणत्या योजनांसाठी करते ते आता पहायचे.

रिझर्व्ह बँकेने गेल्या तीन वर्षांपासून सरकारची फार मोलाची मदत केली आहे. रिझर्व्ह बँकेला होणाऱ्या नफ्यातील काही भाग स्वतःकडे ठेवून बँक केंद्र सरकारला लाभांश देत असल्याने या रकमेचा वापर सरकार वेगवेगळ्या कारणांसाठी करू शकते. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या सरकारी तिजोरीवरचा ताण कमी होत आहे. पाकिस्तानने भारतात दहशतवादी घुसवून एक प्रकारे भारताच्या अर्थव्यवस्थेला धक्का लावण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न होता. काश्मीरमधील पर्यटनावर परिणाम झाला आहेच. भारत आणि पाकिस्तानदरम्यानच्या तणावानंतर भारताला संरक्षण खर्चासाठी तरतूद वाढवावी लागली. एकीकडे पाकिस्तान कुरापती करत असताना अमेरिकेच्या अध्यक्षांनीही भारतावर टॅरिफ अस्त्र उगारले. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. सरकारच्या योजनाबाह्य खर्चात वाढ होत असताना रिझर्व्ह बँक मदतीला आल्याने पाकिस्तान आणि अमेरिकेचेही मनसुबे उधळून लावल्यासारखी स्थिती आहे. रिझर्व्ह बँकेने दोन लाख ६९ हजार कोटी रुपयांचा लाभांश दिल्याने सरकारला जीडीपीच्या ०.१५ टक्के एवढा अतिरिक्त राजकोषीय पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. सलग तिसऱ्या वर्षी रिझर्व्ह बँकेचा प्रत्यक्ष लाभांश अंदाजित रकमेपेक्षा जास्त आहे. आर्थिक वर्ष २०२५–२०२६ च्या अर्थसंकल्पातील अंदाजित २.१ ट्रिलियन रुपयांपेक्षा हा लाभांश सुमारे २८ टक्के जास्त आहे. अहवालानुसार, ही अतिरिक्त रक्कम कर संकलनातील संभाव्य घट आणि नाममात्र जीडीपीवाढीची भरपाई करू शकते. 'एमके ग्लोबल फायनान्शियल सर्व्हिसेस'च्या अहवालानुसार या मोठ्या लाभांशामुळे यंत्रणेमधील तरलता सुधारेल.

या पार्श्वभूमीवर येत्या काळात ४ ते ४.५ ट्रिलियन रुपयांची 'सुपर सरप्लस लिक्विडिटी' दिसून येऊ शकते. यामध्ये चलनात हंगामी घसरण आणि रिझर्व्ह बँकेचे 'ओपन मार्केट ऑपरेशन' (ओएमओ) महत्त्वाची भूमिका बजावतील. गेल्या वेळच्या तुलनेत या वेळी ३९८ अब्ज डॉलरची सकल परकीय चलन (एफएक्स) विक्री जास्त होती. त्यामुळे परकीय चलनातून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी वाढ झाली. यासोबतच सरकारी सुरक्षे(जी–सेक)मधून मिळणारे व्याजाचे उत्पन्नही वाढले आहे. याच कारणामुळे या वेळी रिझर्व्ह बँक इतका मोठा लाभांश देऊ शकली. अहवालानुसार, या वर्षाच्या अखेरीस दहा वर्षांच्या सरकारी बाँडचे उत्पन्न सहा टक्क्यांपर्यंत घसरू शकते. पाकिस्तानच्या 'प्रॉक्सी वॉर'मुळे भारताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता होती. दुसरीकडे, अमेरिकन टॅरिफमुळे भारताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासालाही धक्का बसू शकतो. अशा परिस्थितीमध्ये रिझर्व्ह बँकेकडून सरकारला मिळणारा लाभांश अमेरिकेने लादलेल्या शुल्कवाढीचा आणि पाकिस्तानसोबतच्या संघर्षामुळे संरक्षणावरील वाढत्या खर्चाचा सामना करण्यास मदत करेल. ही रक्कम पाकिस्तानला जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या देणगीपेक्षा खूपच जास्त आहे. पाकिस्तानला पुढील दहा वर्षांमध्ये जागतिक नाणेनिधीकडून सात अब्ज डॉलर्स आणि जागतिक बँकेकडून २० अब्ज डॉलर्सचे बेलआउट पॅकेज मिळणार आहे.




भारत सरकारला रिझर्व्ह बँकेकडून ३१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी मिळाला आहे. पाकिस्तानला आपल्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यासाठी जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकांसारख्या संस्थांच्या दयेवर अवलंबून रहावे लागते आहे. त्याच वेळी रिझर्व्ह बँक एका वर्षात सरकारला लाभांश म्हणून त्यापेक्षा खूप जास्त पैसे देत आहे. २०२४–२५ मध्ये रिझर्व्ह बँक ३७१.६ अब्ज डॉलर्सची विक्री करणार आहे. गेल्या वर्षी विकलेल्या १५३ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत हे प्रमाण दुप्पट आहे. त्यामुळे रुपया स्थिर होईल आणि परकीय चलनाचा नफा मिळेल. विक्रमी लाभांशामुळे सरकारला अधिक आर्थिक आधार मिळतो. यामुळे राजकोषीय तूट २०–३० बेसिस पॉइंट्सने कमी होण्याची अपेक्षा आहे. राजकोषीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यांवरून सुमारे ४.२ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या २.६९ लाख कोटी रुपयांच्या रकमेचा वापर सरकार विविध विकासकामांसाठी आणि अर्थव्यवस्थेचे संतुलन साधण्यासाठी करेल. सरकारचा एकूण खर्च त्याच्या एकूण उत्पन्नापेक्षा जास्त असतो, तेव्हा राजकोषीय तूट म्हणतात. प्रत्येक सरकार ही तूट कमी करू इच्छिते. २०२५–२६ साठी सरकारने वित्तीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. रिझर्व्ह बँकेने लाभांश दिल्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढेल आणि उत्पन्न आणि खर्चातील फरकही कमी होईल. स्टेट बँकेच्या अहवालानुसार रिझर्व्ह बँकेकडून लाभांश मिळाल्याने वित्तीय तूट जीडीपीच्या ४.२ टक्क्यापर्यंत कमी होऊ शकते.

रिझर्व्ह बँकेकडून लाभांश मिळाल्यानंतरही सरकारने कर्ज घेणे कमी केलेले नाही, तर त्यांच्या खिशात खर्च करण्यासाठी भरपूर पैसे असतील. हे पैसे कल्याणकारी योजना आणि सरकारी अनुदानांवर खर्च करता येतील. इमारती, रस्ते, पूल, अशा पायाभूत सुविधांवर पैसे खर्च करण्याला भांडवली खर्च म्हणतात. त्यातून रोजगार वाढतो. चलन फिरते आणि बाजारात उलाढाल वाढते. केंद्र सरकारची सध्याची अवस्था 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे' अशी आहे. रिझर्व्ह बँकेने नफ्यातील किती टक्के रक्कम केंद्र सरकारला द्यावी, याबाबत मतमतांतरे आहेत. डॉ. रघुराम राजन, डॉ. ऊर्जित पटेल यांच्यासारख्या काही गव्हर्नरांचा रिझर्व्ह बँकेचा लाभांश केंद्र सरकारला द्यायला विरोध होता. आपत्कालीन परिस्थितीत या निधीचा वापर बँकांच्या सुदृढीकरणासाठी केला जावा, अशी त्यांची भूमिका होती. रिझर्व्ह बँकेचे पैसे सरकारला देण्यासही विरोध असण्याचे कारण नाही; परंतु या निधीचा वापर सरकार कसा करते, हे पहायला हवे. रिझर्व्ह बँक दर वर्षी नफ्याचा एक भाग सरकारला लाभांश म्हणून देते. रिझर्व्ह बँक कायदा १९३४ अंतर्गत या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. गेल्या वर्षी भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली होती. त्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या नफ्यातही वाढ झाली. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्यामुळे बँकेचे उत्पन्न वाढले होते. आता रेपोदरात कपात सुरू झाली आहे.

या वर्षी रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेला लाभांश हा आतापर्यंतचा सर्वात मोठा असून बिमल जालान समितीच्या शिफारशीच्या आधारे दिला जात आहे. या पैशाचा वापर करून सरकार वित्तीय तूट कमी करू शकेल. तसेच नवीन योजनांवर नेमकेपणाने खर्च करण्यास मदत होईल. या पैशांच्या वापरामुळे सरकारला लोककल्याणकारी योजनांसाठी पैसे जमा करणे पूर्वीपेक्षा सोपे होणार आहे. कोणत्याही सरकारचे विविध स्रोतांमधून मिळणारे उत्पन्न खर्चापेक्षा कमी असते, तेव्हा वित्तीय तूट निर्माण होते. सरकारला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कर इत्यादींमधून उत्पन्न मिळते; मात्र पगार, अनुदान, व्याज आदींसाठी सरकारकडून हा खर्च केला जातो. ही परिस्थिती चांगली नाही. कारण याचा अर्थ सरकार आपला खर्च भागवण्यासाठी कर्ज घेत आहे, असा होतो. सरकारने कमी कर किंवा शुल्क वसूल केले किंवा अर्थव्यवस्था मंद गतीने वाढत असेल, तर कमी महसूल मिळतो. अशा वेळी लाभांशाचा भरणा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम करू शकतो. त्यामुळे सरकारला खर्च करण्यासाठी अतिरिक्त पैसा मिळतो. रिझर्व्ह बँक व्यापारातून कमाई करते. रुपयाचे मूल्य संतुलित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक बाजारात डॉलरची विक्री करते. पुढील महिन्यातही रिझर्व्ह बँक दर कमी करेल, अशी अपेक्षा आहे. यामुळे ईएमआय कमी होण्याची शक्यता आहे. याशिवाय यामुळे संरक्षण आघाडीवर सरकारला मोठा दिलासा मिळू शकतो. कारण भारत–पाकिस्तान तणावामुळे देशाला आपले संरक्षण बजेट वाढवावे लागेल, अशी अपेक्षा होती. यामुळे त्याचे नुकसान वाढण्याची शक्यता होती. तथापि, रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या पैशामुळे सरकारला या क्षेत्राकडून दिलासा मिळेल.

आता भविष्यात भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला तर वित्तीय तुटीवर परिणाम होऊ शकतो. संरक्षण, भारतीय सेना तसेच सीमेवरील तणावादरम्यान संरक्षण खर्चाचा भारताच्या आर्थिक बळावर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी रिझर्व्ह बँकेचा निधी संरक्षण सिद्धतेवर आणि सरकारी तिजोरीतील निधी पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांसाठी उपयोगी पडतो.

# पाथर्डी आगाराच्या दुरवस्थेविरोधात बैठा सत्याग्रह

## मागण्या मान्य करा अन्यथा, आमचा लढा सुरूच राहिल : सोनटक्के

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाथर्डी येथील आगाराच्या दुरवस्थेच्या विरोधात बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ग्राहक संरक्षण समितीचे तालुकाध्यक्ष अरविंद सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली बसस्थानकावर बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

पाथर्डी आगाराला नवीन बस गाड्या मिळाव्यात, जुना बस स्थानकावर महिला प्रवाशांसाठी शौचालयाच्या अभावामुळे होणाऱ्या हाल अपेष्टां होत असून तालुका व परिसरात प्रमुख तीर्थक्षेत्र असल्याने जिल्हाभरातून अनेक भाविक भक्त येथे येतात.

निवेदनातील मागण्यांची गांभीर्याने दखल घेत आगार व्यवस्थापक आरिफ पटेल यांनी लेखी आश्वासन दिले की, जुन्या बसस्थानकावर स्वच्छतागृहाची कामे दहा दिवसांत सुरू केले जातील, सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार सुरू आहे.याशिवाय, मागील दोन महिन्यांत पाथर्डी आगाराला दहा नवीन बसेस मिळाल्या असून आणखी वीस बसेस मिळाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले. यावेळी शिवशंकर राजळे, बंडू बोरुडे, हुमायून आतार, विष्णुपंत पवार, नवनाथ चव्हाण, सुभाष हंडाळ, अण्णा हरेर, सचिन नागापूरे हे आंदोलनात सहभागी झाले होते.

> पाथर्डी बसस्थानकावर सुरक्षा, स्वच्छता, शौचालय तसेच जुन्या आणि नव्या बस स्थानकावर सीसीटीव्ही कॅमेरे यांसारख्या मूलभूत सुविधा नाहीत. यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाला जागा आणण्यासाठी आमचा लढा सुरू राहून, येथील असलेल्या उणीव आणि सोय सुविधा जो पर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत आमचा लढा सुरूच राहील.
>
> **– अरविंद सोनटक्के**




# ईदच्या पैशांचे आमिष दाखवून महिलांची फसवणूक

## श्रीरामपूरातील महिलेचे ५२ हजाराचे दागिने लांबविले; गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : ईदच्या निमित्ताने सौदी अरेबियातून गरीब आणि विधवा महिलांसाठी पैसे आल्याचे आमिष दाखवून, एका अज्ञात व्यक्तीने हसीना गफूर पठाण (रा. श्रीरामपूर) या महिलेची ५२,३०० रुपये किमतीचे दागिने घेऊन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हसीना गफूर पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. ७ जून रोजी रात्री उशिरा गुन्हा रजी. ५५२/२५ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (१) आणि ३१८ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपीने पठाण यांना सौदी अरब येथून गरीब व विधवा महिलांसाठी ईदच्या अनुषंगाने पैसे आले आहेत आणि ते वाटप चालू आहे. तुम्ही तुमचे दागिने काढून ठेवा, असे सांगून त्यांना श्रीरामपूर शहरातील एका सोनार दुकानात नेले. तेथे त्यांच्याकडील ८०० रुपये रोख रक्कम आणि ३ ग्रॅम सोन्याच्या कानाच्या बाळ्या, ५ ग्रॅम कानाचे टॉप्स, अर्धा ग्रॅम नाकातील मुरणी, १२ ग्रॅम सोन्याचे मणी (४८ नग) असे एकूण ५२,३०० रुपये किमतीचे दागिने काढून घेतले. त्यानंतर ते दागिन्यांची पोटली बांधत असल्याचे दाखवून, प्रत्यक्षात त्यांची फसवणूक केली असल्याची माहिती सदर फिर्यादी महिलेने दिली आहे

या घटनेने शहरात खळबळ उडाली असून, अशा आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे करत आहेत.

# वटपौर्णिमेनिमित्त महिलांच्या हस्ते वडाचे वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सुवासिनींच्या सौभाग्याचा सण मानल्या जाणाऱ्या वटपौर्णिमेनिमित्त कृष्णाली फाऊंडेशनच्या वतीने शहरातील गणेशनगर येथे एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये महिला पोलीस अधिकारी, स्थानिक महिला नगरसेविका तसेच एकल महिलांच्या हस्ते वडाचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासह सांस्कृतिक परंपरेला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देण्यात आली.

वड हे भारतीय संस्कृतीत धार्मिक आणि पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत पूजनीय आणि उपयुक्त झाड मानले जाते. त्याचा ऑक्सिजन पुरवठा करण्याचा गुण, आणि स्त्रियांनी आपल्या पतीस दीर्घायुष्य लाभावे यासाठी वडाच्या वृक्षाची पूजा करण्याची परंपरा, याचे महत्त्व अधोरेखित करत कृष्णाली फाऊंडेशनने महिलांच्या हाताने वडाचे झाड लावण्याचा उपक्रम राबवला.

वटपौर्णिमा हा सुवासिनीचा सन मानला जातो परंतु कृष्णाली फाऊंडेशन या ठिकाणी एकल महिलांना मान सन्मान दिला आणि त्यांच्या हाताने देखील वडाचे झाडाचे रोपण केले, या सामाजिक कार्यक्रमात जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस दलातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील मोठ्या उत्साहाने यामध्ये सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमासाठी कृष्णाली फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, माजी महापौर रोहिणीताई शेडगे, पीएसआय शितल मुंगडे, प्रियंका पाटील शेळके, हेड कॉन्स्टेबल वैशाली पठाडे, पोलीस नाईक योगिता साळवे, कॉन्स्टेबल सोनाली भागवत, माजी नगरसेविका वैशाली नळकांडे, सविता शिंदे, जयश्री देवतरसे, गणेशनगर सोसायटीचे उपाध्यक्ष गायत्री सतीश बागडे, आशा शेळके, ताराबाई शिंदे, साधना गरड, शुभांगी भगने, भारती कोमकुल, जयश्री सोनवणे, सुवर्णा इरोळे, ज्योती रासकर, कामिनी बोराडे आदींसह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## सत्ताधाऱ्यांकडून विधानसभेत मॅच फिक्सिंग

जनतेच्या मनात आजही ईव्हीएम बाबत शंका आहे. अनेक ठिकाणी बोगस मतदान झाले. इतके मतदार वाढले कसे? काही ठिकाणी लोकसंख्येपेक्षा मतदानाचे रजिस्ट्रेशन कसे जास्त होऊ शकते. शेवटच्या तासामध्ये सहा लाख मतदान कसे वाढले, अशा अनेक गोष्टी शंकास्पद आहेत. याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये एका होस्टेलमध्ये ७००० मतदार नोंदणी आणि त्यांना निवडणुकीचे कार्ड सुद्धा देण्यात आले होते. हा काय प्रकार आहे? भाजप आणि मित्रपक्ष जिंकण्यासाठी काहीही करतात. निवडणूक आयोग स्वायत्त असला पाहिजे. मात्र आता तसे राहिले नाही, तो बीजेपी साठी काम करत आहे. निवडणूक निकालानंतर व्हीव्हीपॅटच्या स्लिप मिळायला पाहिजे होत्या. परंतु त्या निवडणूक आयोगाने नाकारल्या. विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे १५७ उमेदवार विजयी होतील हे खात्रीशीर होते. परंतु, मतदार वाढवणे, हे त्यांचे प्लॅनिंग चे राजकारण होते. अनितीचे राजकारण हे लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे. खासदार राहुलजी गांधी यांच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नाहीत. निवडणूक आयोग ऐवजी दुसरेच लोक उत्तरे देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. सत्तेसाठी काहीही करणाऱ्या भाजपने महाराष्ट्र विधानसभेमध्ये मॅच फिक्सिंग केली असल्याची टीका करताना देशाची लोकशाही राज्यघटना टिकली पाहिजे यासाठी आमचा लढा सुरू राहील, असेही काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

## तब्बल ११४ इतर धर्मीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती

श्रद्धास्थानांमध्ये शुद्धतेचा आणि पारंपरिक व्यवस्थेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असतो. गोमांस खाणाऱ्या किंवा हिंदू धर्म मान्य नसलेल्या कर्मचाऱ्यांचा प्रवेश मंदिर प्रशासनात कसा व का?, असा सवाल यानिमित्ताने उभा राहिला आहे. सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणती तपासणी झाली. धार्मिक आचारपालनाची शपथ घेण्यात आली का, याविषयी स्पष्ट माहिती ट्रस्टकडून दिली गेलेली नाही. त्यामुळे या मोर्चाच्या निमित्ताने शनि मंदिर प्रशासन, शासन व धर्मदाय आयुक्त विभागावर जनतेचा दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी भाविकांना आवाहन केले आहे की, श्री शनि शिंगणापूर क्षेत्र शुद्ध ठेवा, धर्मरक्षणासाठी रस्त्यावर या! हे केवळ एका गावाचे नव्हे, तर संपूर्ण हिंदू समाजाच्या अस्मितेचे आंदोलन आहे.

## महायुती म्हणून एकत्र लढणार: ना. बावनकुळे

आम्ही निवडणूक लढणार आहोत. मात्र, एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल, असे विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या विधानाला मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. अलीकडेच राज्य सरकारने महापालिकांना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाकडूनही या निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यामुळे या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

## निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणापासून दहा हजार शिक्षक वंचित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राज्यात वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणापासून सुमारे दहा हजार शिक्षक वंचित राहिले असताना त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. तर प्रशिक्षणात शिक्षकांना मिळणारी अपमानास्पद वागणुक व गैरसोयीबद्दल लक्ष शिक्षण विभागाचे लक्ष वेधण्यात आले आहे. यासंदर्भात शिक्षक परिषदेचे माजी शिक्षक आमदार तथा राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांना निवेदन दिले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे बाबासाहेब बोडखे यांनी दिली. राज्यातील तालुका सर्व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा २ जून पासून प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत १२ जून पर्यंत होणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी २ जून रोजी सकाळी प्रशिक्षणातील शिक्षक प्रशिक्षण केंद्रावर उपस्थित झाले, परंतु त्यांची नियोजित कार्यपद्धतीनुसार उपस्थिती नोंदविण्यात न आल्यामुळे त्यांना प्रशिक्षणात अनुपस्थिती दाखवण्यात आली. दुसऱ्या दिवशी ३ जूनला त्यांना परत पाठवण्यात आले. काही केंद्रावर प्रशिक्षणार्थी शिक्षकांना ३ व ४ जूनला प्रशिक्षणातून परत पाठवण्यात आले. प्राप्त माहितीनुसार राज्यातील प्रशिक्षण केंद्रावरून सुमारे दहा हजार प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित करून परत पाठवण्यात आले असल्याची आरोप शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आला आहे.

## मिश्रा यांनी पटकाविले दोन सुवर्ण पदके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : येथील अनुराधा मिश्रा यांनी नॅशनल पॉवर लिफ्टिंग ॲण्ड डेडलिफ्ट अनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविले. नुकतीच ही राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धा दिल्ली रोहिणी येथे पार पडली. यामध्ये ३० पेक्षा अधिक महिला स्पर्धक सहभागी झाल्या होत्या.या स्पर्धेत मिश्रा यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांची स्पेन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मिश्रा भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिल्ली रोहिणी येथील राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मिश्रा यांनी ६३ किलो वजनगटात त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन सुवर्णपदकांची कमाई केली. मिश्रा यांना या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकर मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## तक्षशिला ट्रस्ट व ग्रामस्थांचे आमरण उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : करंजी (ता. पाथर्डी) येथील तलाठी कार्यालयाच्या शासकीय जागेवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात तक्षशिला चॅरिटेबल ट्रस्ट व ग्रामस्थांनी ११ जून रोजी पाथर्डी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. उपोषणकर्त्यांनी तहसीलदार उद्धव नाईक यांची भेट घेऊन त्वरित कारवाईची मागणी केली. तहसीलदारांनी तीन दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने तात्पुरते उपोषण मागे घेण्यात आले.

करंजी गावातील तलाठी कार्यालयासाठी पाच गुंठे शासकीय जागा हुकूमनामा अन्वेय राखीव ठेवण्यात आली होती. या जागेवर सध्या अतिक्रमण झाल्याने तलाठी कार्यालय कार्यरत नसून ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर दि.१५ में ला ग्रामस्थांनी उपोषण केले होते. त्यावेळी तहसील कार्यालयाने विविध विभागांना पत्र पाठवून मोजणी व अतिक्रमण हटवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अनेक दिवस उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे बुधवारी पुन्हा आंदोलन करण्यात आले. यावर सकारात्मक चर्चा होऊन येत्या दोन ते तीन दिवसात अतिक्रमण काढण्यात येतील, असे आंदोलन करताना प्रशासनाच्या वतीने सांगितल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

प्रशासनाने येत्या तीन दिवसांमध्ये अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू केली आहे.या उपोषणात आर. पी. आय. चे तालुका अध्यक्ष बाबा राजगुरू, माजी सरपंच नवनाथ आरोळे, बाबासाहेब मोरे, विश्वास क्षेत्रे, सुधीर आरोळे, लाजरस क्षेत्रे, कैलास क्षेत्रे, अझर पठान, धर्मा क्षेत्रे, संदीप क्षेत्रे, तुषार क्षेत्रे, आकाश क्षेत्रे, संकेत क्षेत्रे, सुनील भावले आदींनी सहभाग नोंदवला.

# नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ गरजेचा

## जिल्हाधिकारी; बेलापुरात छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर**: नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी तातडीने मिळणे आवश्यक आहे. या दृष्टिने शासकीय योजनांचा लाभ निर्धारित वेळेत मिळावा तसेच नागरिक आणि प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण व्हावा, या हेतूने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आशा प्रकारच्या शिबिरांचे प्रत्येक महसूल मंडलात आयोजन करण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

महसूल व वन विभाग तसेच बेलापूर बु. ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने बेलापूर येथे आयोजित छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधताना जिल्हाधिकारी बोलत होते. याप्रसंगी शिर्डीचे अप्पर



जिल्हाधिकारी बाबासाहेब लोकेकर, उपविभागीय महसूल अधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंद वाघ, नायब तहसीलदार बी. बी. गोसावी, शेकटकर, श्रीमती नाईक, जि. परिषद सदस्य शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, सरपंच मिना साळवी, उपसरपंच प्रियंका कुऱ्हे, रामराव शेटे उपस्थित होते.

देविदास देसाई, विष्णुपंत डावरे यांनी सूत्रसंचलन केले. दिवसभर चाललेल्या महाराजस्व शिबिरात उपस्थितांना विविध शासकीय योजनांचे दाखले, रेशन कार्ड, शासकिय प्रमाणपत्रे, ग्रामपंचायत दाखले वितरीत करण्यात आले.शिबिरास बेलापूर महसूल मंडलातील नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. शिबिरस्थानी विविध महिला बचत गटांनी खाद्यपदार्थ, मसाले आदि उत्पादनांचे स्टाल लावले होते. शिबिरास भास्कर खंडागळे, मुश्ताक शेख,चंद्रकांत नवले, इस्माईल शेख,मारुतराव राशिनकर, ॲड. अरविंद साळवी, भैय्या शेख, जाकीर शेख, बाबालाल पठाण, महेश कुऱ्हे, प्रभात कुऱ्हे, बाबुराव पवार, चंद्रकांत नाईक, प्रकाश कुऱ्हे, गणेश बंगाळ, रावसाहेब गाढे, विशाल आंबेकर, भाऊसाहेब तेलोरे, इस्माइल आतार आदिंसह बचत गटाच्या महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विविध दाखल्यांचे केले वितरण

सदर शिबिरादरम्यान जिल्हाधिकारी आशिया यांचे हस्ते नागरिकांना सेतू कार्यालयाकडील जातीचे दाखले, संजय गांधी निराधार योजनेचे प्रमाणपत्र, पुरवठा विभागाकडील आन लाईन पध्दतीचे रेशन कार्ड, ग्राम पंचायत वतीने मृत्यु दाखला, कृषी विभागाकडून खत गोणी, गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान मंजुरी पत्र, ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाकडील हयातीचा दाखाला आदी प्रदान करण्यात आले.

## चोवीस तासातच गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी खुला

### पारिजात चौकातील ड्रेनेज लाईनचे काम युद्धपातळीवर पूर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ड्रेनेज लाईनच्या कामासाठी वाहतुकीसाठी पारिजात चौक येथे बंद करण्यात आलेला गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. महानगरपालिकेने ठेकेदारामार्फत सात पोकलेन मशीनच्या सहाय्याने युद्धपातळीवर काम पूर्ण करून घेत दहा दिवसांऐवजी २४ तासातच काम पूर्ण केले आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे.

२४ तासात काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याने पारिजात चौक येथे नागरिकांनी आमदार संग्राम जगताप, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, ठेकेदार दत्त दिगंबर कन्स्ट्रक्शन यांचे आभार मानले. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, शिरीष जानवे, प्रदीप घोडके, अभय खाबिया, लक्ष्मीकांत



पठारे, विशाल साबळे, अशोक दहिफळे, आकाश सोनवणे, निलेश आव्हाड, प्रसाद पाठक, तसेच नरहरी नगर भागातील होमकर साहेब, चिंतामणी साहेब, सचिन कसबे, दीपेश दाणे, दिपक दळवी, विशाल पालवे आदी गुलमोहर रोड भागातील सर्व नागरिक उपस्थित होते.दोन दिवसांपूर्वी महानगरपालिकेने पारिजात चौक येथे ड्रेनेज लाईनचे काम करण्यासाठी गुलमोहर रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार काम सुरू करण्यात आले. मात्र, महानगरपालिकेने २४ तासात काम पूर्ण करून १० जून रोजी रस्ता तत्काळ वाहतुकीसाठी खुला केला आहे. युद्धपातळीवर काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याने नागरिकांनी आमदार संग्राम जगताप, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे आभार मानले आहेत.

## प्रशिक्षणात शिक्षिकांनी केली साजरी वटपौर्णिमा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व जिल्हा प्रशिक्षण संस्था (डायट) संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक तालुक्यात वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित केलेले आहे. अकोले येथील प्रशिक्षणात महिला शिक्षिकांनी वटपौर्णिमेनिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अनोखी वटपौणिमा साजरी केली.



यावेळी विस्ताराधिकारी सविता कचरे यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय येथे हे प्रशिक्षण सुरु आहे. या प्रशिक्षणात वेगवेगळे दिनविशेष साजरे केले जात आहेत. वटपौर्णिमेचे औचित्य साधून महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून केली. वटपौर्णिमा साजरी केली.यावेळी रेखा कांबळे यांनी मी सावित्रीबाई फुले बोलते हे स्वगीत सादर केले.

यावेळी जिल्हा प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता प्रा. अरुण भांगरे उपस्थित होते. यावेळी शिक्षकांतर्फे सर्व महिला शिक्षिकांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

## शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणार : करणसिंह घुले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सतत दखल घेऊन कामकाज करणाऱ्या शेतकरी संघटनेच्या पाठीमागे नेवासा येथील समर्पण फाउंडेशनची ताकद नेहमीच राहणार असल्याचे समर्पण फाउंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. करणसिंह घुले यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सतत पाठपुरावा करण्यासाठी शेतकरी संघटनेची नेहमी ओढाताण होत आलेली आहे. मोर्चे, आंदोलने शेतकरी नेते अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असतात. शेतकऱ्यांना एकत्रित येण्यासाठी, विविध विषयांवर चर्चा करण्याकरिता नेवाशात शेतकरी संघटनेला ठिकाण असले पाहिजे, यासाठी समर्पण फाउंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. घुले यांनी व सहकाऱ्यांनी नेवासा फाट्यावर कार्यालय उपलब्ध करून दिले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. घुले यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. शेतकरी संघटनेचे कार्याची माहिती सांगून आपण सामाजिक कार्य सतत करत आलेलो आहे. शेतकरी संघटनाही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर झगडत आहे. आमच्या समर्पण फाउंडेशनची ताकद नेहमी त्यांच्या संघटनेबरोबर असणार आहे.

ॲड. अजित काळे, दिलिप पवार, बाबासाहेब खराडे, अशोकराव ढगे आदिंनी मनोगत व्यक्त केले.

## संगमनेरातील १७१ गावांमध्ये २५२५ वटवृक्षांचे रोपण

### दंडकारण्य अभियानांतर्गत वटपौर्णिमेनिमित्त राबवला उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेनिमित्त संगमनेर तालुक्यातील १७१ गावे २५८ वाड्या-वस्त्यांवर महिला भगिनींनी मोठ्या आनंदात व उत्साहात २५२५ वटवृक्षांचे रोपण व पूजन करून वृक्ष संवर्धनाचा मंत्र दिला.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडकारण्य अभियान समिती व अमृत उद्योग समूह यांच्या सहकार्याने आणि नागरिकांच्या सहभागातून दंडकारण्य अभियान ही पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ बनली आहे. प्रकल्पप्रमुख दुर्गा तांबे व डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली १७१ गावे २५८ वाड्या-वस्त्यांवर २५२५ वटवृक्षांचे महिलांनी रोपण व पूजन करत संवर्धनाची जबाबदारी उचलत राज्यापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे. देवकौठे ते बोटा अशा १०६ किलोमीटर लांबी असलेल्या विस्तीर्ण संगमनेर तालुक्यामध्ये सर्व महिलांनी देववृक्ष असलेल्या

वटवृक्षाचे पूजन व संवर्धन करून पर्यावरण संवर्धनात महत्त्वाचा वाटा उचलताना राज्याला हिरव्या सृष्टीचा मंत्र दिला आहे. गावोगावी पारंपरिक पद्धतीने नटून थटून महिलांनी वटवृक्षाचे पूजन केले. निर्मला गुंजाळ, अर्चना बालोडे, प्रमिला अभंग, मंदा सोनवणे, दीप्ती सांगळे, प्रीती फटांगरे, भाग्यश्री नरवडे, बेबी थोरात, मीनाक्षी थोरात, ममता गुंजाळ, पद्मा थोरात, शकुंतला सोसे, शीतल उगलमुगले, मीरा शेटे, नंदा खेमनर, प्रतिभा जोंधळे, निशा कोकणे, लता गायकर, अनिता सोनवणे आदी महिलांनी मोठ्या उत्साहाने वटवृक्षाचे पूजन केले. दरम्यान, भारतीय संस्कृतीमध्ये वटसावित्री पौर्णिमेला मोठे महत्त्व असून वड हा दीर्घायुष्य वृक्ष आहे. तो मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन देत असून आध्यात्मिक आणि शास्त्रीय असे दोन्ही कारण वटपूजेसाठी आहेत. मागील दहा वर्षांपासून तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये महिला भगिनी वटपौर्णिमेच्या दिवशी वटवृक्षाचे रोपण व पूजन करत असतात. यातून तालुक्यात झाडांचे संवर्धन करण्याची संस्कृती वाढली आहे. प्रत्येक घराच्या भोवताली वृक्षांसह परसबागा निर्माण झाल्या आहे. अजूनही प्रत्येक महिलेने दरवर्षी किमान दोन वृक्षांचे रोपण करावे, असे आवाहन यानिमित्ताने दुर्गा तांबे यांनी केले

## गावडे कुटुंबाला किराणा किटचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील कौठे मलकापूर येथील सुनील पांडुरंग भूतांबरे व किरण पाराजी गावडे यांचे अपघातात निधन झाले. ही माहिती मिळताच लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयाच्या वतीने मयतांच्या कुटुंबीयांना किराणा किटचे वाटप करून मदतीचा हात देण्यात आला आहे.



भूतांबरे व गावडे कुटुंबांना किराणा किट देण्यात आली यावेळी आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, सरपंच राहुल गंभीरे माजी सरपंच लक्ष्मण गीते, नामदेव भूतांबरे, अर्जुन गावडे, गंगुबाई भूतांबरे, गीताबाई भूतांबरे, नवनाथ गंभीरे, रोहिदास नागरे, सोनाली भुतांबरे, पाराजी गावडे, अक्काबाई गावडे, मीराबाई गावडे, उपसरपंच पोपट पचपिंड, संदीप पचपिंड, भाऊसाहेब गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तालुका हा कुटुंबाप्रमाणे मानला असून त्यांनी सातत्याने गोरगरीब व सर्वसामान्य लोकांना नेहमी मदत केली आहे. याचबरोबर तालुक्यातील गाव आणि वाडी -वस्तीवर विकासाच्या योजना राबवल्या आहेत. थोरात साहेब यांच्या सूचनेनुसार यशोधन कार्यालयाचे मुख्याधिकारी डॉ. नितीन भांड, कार्यालयीन अधीक्षक रामदास तांबडे यांनी भूतांबरे व गावडे कुटुंबांना किराणा किटचे वाटप केले आहे.

या अपघाताच्या दुःखद घटनेची माहिती मिळताच थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांनीही या दोन्ही कुटुंबाची काल सांत्वनपर भेट घेतली होती. यावेळी त्यांच्या समवेत शंकर खेमनर, संचालक विलास शिंदे, उपसरपंच राहुल गंभीरे, लक्ष्मण गीते, उपसरपंच पोपट पचपिंड, संदीप पंचपिंड यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जगताप यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क व परिसरात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. त्यांच्या समाजसेवेच्या आणि राजकीय कार्यकर्तृत्वाची स्मृती जपण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. तर मागील वर्षी लावलेल्या झाडांचे संवर्धन करुन त्यांचा पहिला वाढदिवस साजरा करण्यात आला.



हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पर्यावरण संवर्धन सप्ताहानिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याची मोहिम सुरु आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सदर वृक्षारोपण अभियानाचे प्रारंभ राजू लुनिया यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाले. यावेळी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजेंद्र लुनिया, रमेश खंडेलवाल, सीए रवींद्र कटारिया, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, अशोक लोंढे, दिलीप ठोकळ, अभिजीत सपकाळ, दीपकराव धाडगे, मनोहर दरवडे, रतन मेहेत्रे, दीपक अमृत, दिलीप गुगळे, अशोक पराते, सुधीर कपाळे, दीपकराव घोडके आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, मागील २५ वर्षापासून अविरतपणे ग्रुपचे सामाजिक कार्य सुरू आहे. आरोग्याप्रति जागरूक राहून दररोज सकाळी ग्रुपचे सदस्य योग प्राणायाम करतात. तर वृक्षरोपण व संवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण करण्याचे कार्य सुरु आहे. ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांनी सर्व कार्यकर्त्यांना आधार देण्याचे काम केले.

# ... अखेर बाजीराव पानमंद ठरले किंगमेकर

## गोरेश्वर पतसंस्था पुन्हा घेतली ताब्यात; मोठ्या मताधिक्य मिळवत विरोधकांचे केले पानिपत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** गोरेगाव येथील गोरेश्वर ग्रामीण पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकीत अखेर पुन्हा किंगमेकर बाजीराव पानमंद यांनी मोठे मताधिक्य मिळवत विरोधकांचे पानिपत केला व पुन्हा पतसंस्थेवर ताबा मिळविल्याने विरोधकांच्या तोंडचे पाणी पळविल्याने ठेवीदारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

गोरेश्वर पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीकडे नगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागून राहिले होते. या संपन्न झालेल्या निवडणुकीत पतसंस्थेचे अध्यक्ष व शिक्षक बाजीराव पानमंद यांच्या नेतृत्वाखालील गोरेश्वर सहकार संस्थापक पॅनलने सर्वच सर्व ११ जागांवर सुमारे ३०० हून अधिक मतांच्या आघाडीने दणदणीत विजय मिळवत दणका दिला आहे.

### आर्थिक निर्णय, नियोजन करावा लागणार

बाजीराव पानमंद यांना व त्यांच्या नेतृत्वाखालील नूतन संचालकांना पतसंस्थेची पुढील आर्थिक प्रगती साधत कष्टकरी ठेवीदारांच्या सुरक्षित ठेवींसाठी अचूक व आर्थिक निर्णय, नियोजन करावा लागेल, तरच या विजयाला काही अर्थ प्राप्त होईल.

विरोधी गोरेश्वर सहकार बचाव पॅनलचे नेते माजी सभापती बाबासाहेब तांबे यांनी सुरुवातीला गोरेगाव मतदान केंद्रात पानमंद यांच्या गोरेश्वर पॅनलला विजया पासून रोखण्याचा प्रयत्न केला. पण जवळील भाळवणी आणि ढवळपुरी या मतदान केंद्रांवर पानमंद यांच्या नेतृत्वाखालील गोरेश्वर पॅनलने निर्णायक आघाडी घेतल्याने त्यांचा विजयाचा वारू रोखण्यात विरोधकांना अपयश आले. तर बाबासाहेब तांबे यांच्या गोरेश्वर सहकार बचाव पॅनलला कर्जुले हर्या आणि राळेगण थेरपाळ या २ मतदान केंद्रांमधून मोठे मताधिक्य मिळाल्याने निवडणूकीच्या मतमोजणीत रंगत आली. पण बाकी मतदान केंद्रांवर बाजीराव पानमंद यांच्या गोरेश्वर सहकार पॅनलने विजय निश्चित केला. या विजयाने गोरेश्वर पतसंस्थे वर पुन्हा बाजीराव पानमंद यांनी एकहाती वर्चस्व मिळवून विरोधकांना चारी मुंड्या चित केले आहे. या विजयाने पानमंद यांना पतसंस्था पुन्हा व्यवस्थित चालवून नावारूपाला आणावी लागेल, त्याच बरोबर पतसंस्थेत असलेल्या ठेवीदारांच्या कष्टाचा, घामाचा पैसा सुरक्षित ठेवून त्यांना पुन्हा साभार करता येईल, याचे नियोजन करून ठेवीदारांचा, सभासदांचा पुन्हा एकदा विश्वासाचे शिवधनुष्य पेलावे लागेल.



बाजीराव पानमंद यांच्या गोरेश्वर सहकार संस्थापक पॅनलच्या या विजयी सर्व च्या सर्व ११ उमेदवारांनी मोठे मताधिक्य मिळविले. या नूतन संचालकांमध्ये सर्वसाधारण मतदार संघातून सखाराम खोडदे ३८०८, आप्पा थोरात ३८०८, अंबादास नरसाळे ३८१०, शिवाजी नरसाळे ३७६८, अध्यक्ष बाजीराव पानमंद ३८०५, संदीप रोहकले ३५९२, महिला राखीव मतदार संघातून स्नेहल आमले ४०३१, प्रिती पानमंद ४०५७, अनुसूचित जाती जमाती राखीव मतदारसंघातून चंद्रभान शेलार ४०३७, इतर मागासवर्गीय राखीव मतदार संघ प्रशांत चौरे ३९७२, भटक्या विमुक्त जाती जमाती विशेष मागास प्रवर्ग राखीव मतदार संघातून दामू टकले ४१३६ यांचा समावेश आहे.

# पाथर्डी शहरात दरोडेखोरांचा हैदोस ?

## रात्रीच्या सुमारास व्यापाऱ्याकडून ८९ हजार लुटले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास व्यापाऱ्यावर दरोडा टाकून चार अनोळखी दरोडेखोरांनी तब्बल ८९ हजार रुपयांची लूट केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना अहिल्यानगरहून खरवंडी गावाकडे जात असताना कल्याण विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्गावर दिपाली हॉटेलच्या पुढे चांदगाव फाट्याजवळ घडली आहे.

प्रमोद बबनराव अंदुरे (वय ४३, रा. खरवंडी कासार, ता. पाथर्डी) असे लुटमारीचा बळी ठरलेल्याचे नाव असून, त्यांच्यासोबत असलेले बाबासाहेब अंकुश पवार (रा. खरवंडी) हे देखील या घटनेत लुटले गेले आहेत. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गुन्हेगारांचा तपास लावा; नागरिकांची मागणी

पाथर्डी शहराच्या रहिवासी वस्तीमध्ये हि दरोड्याची घटना घडल्याने पोलिसांकडे मोठे आव्हान उभे ठाकले असून या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली आहे. व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांकडून पोलिस प्रशासनावर त्वरित कारवाईचा दबाव वाढू लागला आहे. पोलिसांनी गुन्हेगारांचा लवकरात लवकर तपास लावून त्यांना अटक करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

प्रमोद अंदुरे यांचे खरवंडी येथे भांड्याचे दुकान आहे. ९ जून रोजी ते आणि बाबासाहेब पवार हे दोघे भांडी खरेदीसाठी अहिल्यानगर येथे गेले होते. तिथे त्यांनी सिद्धेश्वर इंटरप्रायझेस व रॉयल जनरल स्टोअर्स गंजबाजार



येथून माल खरेदी केला. खरेदी करून रात्री ९.३० वाजता ते खरवंडीकडे परत निघाले. रात्री साधारणतः ११ वाजता ते माळी बाभुळगाव रोडवरील एका हॉटेलवर जेवण्यासाठी थांबले. जेवण झाल्यानंतर त्यांनी पुन्हा प्रवास सुरू केला.

मध्यरात्री १२.१५ वाजता चांदगाव फाट्या जवळ, समोरून दोन मोटारसायकली त्यांना आडव्या आल्या. त्या मोटारसायकलवर ३ ते ४ अनोळखी तरुण होते. सर्वजण २०-२५ वयोगटातील असून, त्यांनी चेहऱ्याला मास्क लावलेले होते. त्यांनी अंदुरे यांना दमदाटी करत जबरदस्तीने त्यांच्याकडील मोबाईल, रोख रक्कम व अंगठ्या हिसकावून घेतल्या. बाबासाहेब पवार यांचाही मोबाईल आणि रोख रक्कम लुटण्यात आली.

# 'विनायक राज' कडून उद्या मोफत आरोग्य शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सध्याच्या बदलत्या वातावरणामुळे वाढणारे आजारांचे प्रमाण चिंताजनक आहेत. आरोग्य तपासणी करता इतर चाचण्या करण्यासाठी नागरिकांना जास्त पैसे देणे अशक्य असते. त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. यामधून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सावेडीत दि.१३ जून रोजी सकाळी साडेआठ ते दुपारी एक वाजेपर्यंत गुलमोहर रोडवरील कमलाबाई नवले स्मारक येथे विनायकराज प्रतिष्ठान तर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष विपुल वाखुरे यांनी दिली.

रक्त तपासणी मध्ये थायरॉईड, किडनी, लिव्हर, कॅन्सरमार्कर,रक्तातील चरबी इत्यादी तपासण्या पूर्णपणे मोफत करणार आहेत. तरी याचा लाभ सावेडी उपनगरातील नागरिकांनी घ्यावा.

**– प्रदीप वाखुरे**

विनायक राज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त जाहिराती, फ्लेक्स, केक कापणे व इतर खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबविण्याच्या हेतूने सर्वसामान्य नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा. असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

या मोफत आरोग्य शिबिरात सर्व रोग निदान तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यकतेनुसार उपचार औषधे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये मोफत नेत्र तपासणी मध्ये मोतीबिंदू असणाऱ्यांना शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये ज्यांना नेत्रदान, अवयव दान करायचे आहे. त्यांना संमती पत्र देण्यात येतील. शिबिरात नाव नोंदणीसाठी ८२३७३७७००७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुंबईतील पोलीस सर्वात श्रेष्ठ आणि दर्जेदार : संजय निंबाळकर

### कोरेगाव येथे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** एवढी प्रचंड मोठी लोकसंख्या, अनेक जाती धर्माचे व पंथांचे लोक या भव्य मायानगरीमध्ये वावरतात. असे असताना देखील संपूर्ण शहरावर व गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम एवढे सोपे नाही मात्र अशक्य ते शक्य हे मुंबई पोलीस विभाग करून दाखवत असल्यामुळे जगातील सर्वश्रेष्ठ पोलीस म्हणून मी मुंबई पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा उल्लेख करतो, असे प्रतिपादन ऋणमुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय निंबाळकर यांनी कर्जत तालुक्यातील कोरेगाव या ठिकाणी बोलताना प्रतिपादन केले.

बृहन्मुंबई पोलीस विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय निंबाळकर यांचे कर्जत तालुक्यातील कोरेगाव हे गाव आहे. या गावचे भूमिपुत्र आहे. ३१ मे रोजी संजय निंबाळकर हे सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके हे होते.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक बाळासाहेब साळुंखे, दिलीप शेळके, शिवाजीराव फाळके, दीपक शिंदे, काकासाहेब शेळके, भीमराव शेळके, उपप्राचार्य परदेशी, सरपंच संतोष भोसले, श्रीमंत शेळके, सुभाष तनपुरे, प्रकाश धांडे, दत्तात्रय भांडवलकर, प्रभावती संजय निंबाळकर, आबासाहेब निंबाळकर, चंद्रकांत निंबाळकर, चिमसाहेब निंबाळकर, मोहनराव निंबाळकर, महादेव निंबाळकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते. मुंबईमध्ये सर्वत्र नागरिक शिस्त पाहतात याचे प्रमुख कारण म्हणजे त्या ठिकाणी पोलिसांचा धाक आहे. राजकीय हस्तक्षेप अजिबात होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांवर कारवाई केली जाते. कोणालाही सोडले जात नाही. त्यामुळे मुंबई शहरामध्ये रात्री उशिरा देखील लोकल आली. तरी एकटी स्त्री सुरक्षित घरी जाऊ शकते आणि हे सर्व सुरक्षेचे यश फक्त मुंबई पोलीस विभागाचे आहे, असे बृन्हमुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त संजय निंबाळकर म्हणाले.




# गंगापूर बाजारतळात घाणीचे साम्राज्य

## आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; गंगापूर नगरपरिषदेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** गंगापुर नगरपरिषदेच्या भोंगळ कारभारामुळे शहरातील बाजारतळ परिसर सध्या गंभीर आरोग्य संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. या ठिकाणी घेतलेला प्रत्यक्ष फोटो स्पष्टपणे दाखवतो की भाजी विक्री करणाऱ्या स्टॉलच्या अवतीभवती प्रचंड प्रमाणात कचरा, प्लास्टिक पिशव्या, कुजलेले भाजीपाला, वायफळ वस्तू आणि इतर घाण पसरलेली आहे.

या भाजी मंडी बाजारातून दररोज हजारो नागरिक भाजीपाला व फळे खरेदी करत असतात. मात्र, अशा अस्वच्छ वातावरणामुळे रोगराईचा धोका वाढला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

स्थानिकांनी केलेल्या तक्रारीनंतरही नगरपरिषद कोणतीही ठोस स्वच्छता मोहीम राबवत नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

### भाडं घेणं चालू, पण सफाई कुठं?

भाजी मंडी दुकानदारांकडून दररोज भाडे वसूल करणाऱ्या नगरपालिका अधिकाऱ्यांना हा कचरा दिसत नाही का, असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत. स्वच्छ भारत अभियानाच्या नावाखाली लाखो रुपये खर्च करूनही बाजारातली ही दुर्दशा का, हे प्रशासनाने उत्तर द्यावं अशी मागणी होत आहे.

### "पावती कुठंय ? फक्त पैसे घेतात!"

विश्वासार्ह सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या बाजारतळातील लहान दुकानदारांकडून नियमित भाडे घेतले जात आहे, मात्र त्याची कोणतीही अधिकृत पावती दिली जात नाही. त्यामुळे हे पैसे नगरपालिकेच्या अधिकृत खात्यात जात आहेत की नाही, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



# चक्क वयोवृद्ध आज्ञीने रस्त्यावरच घेतली विश्रांती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील नेवासा रोड रेल्वे ओव्हर ब्रिज परिसरात साधारण ७५ ते ८० या दरम्यान असलेल्या वयोवृद्ध आजीने रस्त्यावरच ठाण मांडले असून त्यांनी रस्त्यावरच विश्रांती घेतली. यावेळी बराच वेळ वाहतुकीची कोंडी झाली होती. परंतु, वाहतूक सुरळीत करत वाहन चालकांनी सदर आजीची काळजी घेत वाहने हळू व बाजूने घेत आजीस हुलकावणी मारून आपली वाहने या ठिकाणावरून काढून घेतले.

अगदी रस्त्याच्या मध्यावरच आजीने विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला. परंतु वाहतुकीचे कोंडी होत असल्याने वाहन चालकांमधून मनस्ताप निर्माण झाला. यामुळे संबंधित विभागातील अधिकारी पदाधिकारी यांनी सदर आजीबाबत चौकशी करून आजीचे नातेवाईक यांना माहिती द्यावी, अशी स्थानिक नागरिकांनी मागणी केली. यामुळे दुर्दैवी दुर्घटना होऊ नये. या संदर्भात काळजी घ्यावी. परिसरात बराच वेळ वातावरण तणावग्रस्त झाले होते. आजी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु, आजीने कोणाचेही ऐकले नाही.

# ... आता उत्कृष्ट साहित्यकृतींचा होणार गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यातील साहित्यिकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे. अहिल्यानगर येथील अक्षर साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने सद्गुरू साहेबराव आवारे यांच्या नावाने हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या वर्षीपासून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाबद्दल कवियित्री स्वाती पाटील यांनी माहिती दिली. प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, अक्षरच्या वतीने विविध साहित्यिक उपक्रम सुरू असतात. नवोदित साहित्यिकांना नेहमीच या माध्यमातून व्यासपीठ मिळाले आहे. हे साहित्य पुरस्कारही त्याचाच एक भाग आहे.

कादंबरी, कविता तसेच कथासंग्रह, नाटक, लेखसंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, ग्रंथ, वैचारिक आदी प्रकारातील साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे. वरील प्रकारातील तीन उत्कृष्ट साहित्यकृतींना प्रत्येकी पाच हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, गुरूजींची ग्रंथसंपदा भेट दिली जाणार आहे.

**– प्रा. हेमलता पाटील**

सद्गुरू साहेबराव आवारे यांचे आध्यात्मात मोठे काम आहे. राज्यभरात त्यांच्या नावाने गोशाळा, अन्नछत्र, स्पर्धा परीक्क्षा मार्गदर्शन केंद्र चालविले जाते. योग व ध्यान वर्गांचेही आयोजन केले जाते. परंतु ते मूळ साहित्यिक आहेत. त्यांनी योगसूत्र, भगवद्गीता, ज्ञानेश्वरीचे त्यांनी संपादन केले आहे. त्यांना १९८०च्या दशकात खेळ मांडियेला या ललितसाठी राज्य सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारही मिळाला आहे. यासाठी त्यांच्या नावे उत्कृष्ट साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे.

पुरस्कारासाठी संबंधितांनी प्रा. हेमलता पाटील, राजवर्धन पॅलेस, विंग ए, प्लॅट क्रमांक २, गाडळकर मळा, सारस पुलाजवळ, सारसनगर, नगर-४१४००१ या पत्त्यावर आपले साहित्य (सन २०२३ व २०२४ मधील प्रकाशित) दोन प्रतीत पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ... अबब भुईकोट किल्ल्याजवळ दिसला १३ फुटी अजगर

## गोविंद जोशी यांनी वर्षभरात वाचवले चार अजगरांचे प्राण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील किल्ल्या जवळील आय लव नगर गार्डन जवळ काल रात्री १३ फुटी रॉक पायथन अजगर येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी गोविंद जोशी, कौशल जोशी व करण पारखे यांना रात्री घरी जाताना दिसला. त्यांनी त्वरित सर्पमित्र अमित गायकवाड यांना बोलून घेतले व त्याला पकडण्यासाठी त्यांना अर्धा तास लागला. यावेळी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती,सकाळी त्याला दूर जंगलात निसर्ग अधिवासात सोडण्यात आले.

किल्ला परिसरात परिसरात मोर, विषारी बिनविषारी सर्प, विविध पक्षी यांचा मोठ्या प्रमाणावर ती अधिवास आहे. येथे जंगल पण आहे व खंदक पण आहे. त्यामुळे त्यांना सुरक्षित जागा आहे. जिल्हा प्रशासनाने या ठिकाणी त्यांचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करा.

**– गोविंद जोशी**

गोविंद जोशी यांनी आत्तापर्यंत या परिसरात वर्षभरात ४ अजगराचे प्राण वाचवले आहेत. तसेच अनेक सरपटण्याऱ्या प्राण्याचे त्यांनी अनेक वर्षापासून प्राण वाचवत आहे, त्यांना रेसिक्यू करून त्याच्या अधिवासात सोडत आहेत. यामध्ये ३ किल्ल्याजवळ व १ बेलेश्वर मंदिर जवळ त्यांनी पाहिल्यावर सर्पमित्रांना बोलावून त्यांना पकडले.

नाहीतर रात्रीच्या वेळेस हे गाडीखाली येऊन मृत्युमुखी पडतात, रात्रीच्या वेळेस हे अजगर पावसाळ्यात, उन्हाळ्यात बाहेर पडतात. त्यामुळे या परिसरात रात्री पायी फिरताना व गाडी चालवणाऱ्यांनी काळजी घ्यावी असे सरपटणारे प्राणी दिसल्यास त्यांना वाचवावे व त्वरित सर्पमित्रांना कळवावे, असे ते म्हणाले. हा भाग निसर्ग संपन्न आहे. तसेच नगरजवळ सर्वच ठिकाणी वन्यप्राणी मोठ्या प्रमाणावर आहेत,यामध्ये भारतात रॉक पायथन हा दुर्मिळ होत चाललेला आहे. आणि त्याला वाचवण्याची गरज आहे.



अजगर हा जगात वावरणारा सर्वांत मोठा बिनविषारी सर्प आहे.सरीसृप वर्गातील बोइडी कुलातील पायथॉनिनी उपकुलात त्याचा समावेश होतो. जगाच्या विविध भागांत अजगराच्या अनेक जाती आढळतात. पायथॉन मोलुरस या जातीचे अजगर संपूर्ण भारतात आढळतात.याला रॉक पायथॉन असेही म्हणतात. घनदाट वनात,झाडावर तसेच खडकाळ जमिनींवरही यांचा वावर असतो.

# उंदिरगावातील मंदिरांच्या दानपेट्या फोडल्या

## सीसीटीव्ही लावण्याची ग्रामस्थांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील उंदिरगाव येथील हनुमान मंदिर व स्वामी समर्थ मंदिर येथील दानपेट्या मागच्या आठवड्यात अज्ञात इसमांनी फोडल्या आहेत. या घटनेमुळे ग्रामस्थ नाराज झाले आहेत.

पैकी एक मंदिर हे ग्रामपंचायत ऑफिससमोर असून सदर ऑफिस इमारतीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. परंतु, त्यांची दिशा व्यवस्थित नियोजन न करता लावलेली असल्याने मंदिर फुटेज व्यवस्थित दिसत नाही.

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये धार्मिक ठिकाणांमध्ये अधार्मिक कृत्य घडण्याच्या घटना ताज्या असताना व उंदिरगाव येथे घडलेल्या या दोन घटना लक्षात घेता ग्रामस्थाकडून आक्रमक होत दोन्ही मंदिरांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याची मागणी जोर धरत आहे. या आधी गावात मोटार, केबल चोऱ्या होत असताना सामाजिक कार्यकर्ते पवन पाऊलबुद्धे व सहकारी यांनी सीसीटीव्हीची मागणी केली होती.

सध्या मंदिरात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पवन पाऊलबुद्धे व त्यांचे सहकारी यांनी ग्रामपंचायतला मंदिरात नवे सीसीटीव्ही बसवावे व ते पूर्वीच्या यंत्रणे सारखे खराब नसावे, अश्या आशयाचे पत्र दिले आहे. ग्रामपंचायत मंदिरात कधी सीसीटीव्ही बसवते, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# देवगाव येथे १३० देशी आंब्यांचे अनोखे प्रदर्शन

## स्थानिक महिलांना रोजगार उपलब्ध करून देणारा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : बायफ लाव्हलीहूड महाराष्ट्र आणि अलेइमा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आर्थिक सहकार्याने देवगाव (ता. अकोले) येथे नुकतेच गावरान आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात महाराष्ट्र व गुजरातमधील १३० हून अधिक देशी गावरान आंब्यांच्या दुर्मिळ प्रकारांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले. गावरान आंब्यांचे संवर्धन, ओळख, आर्थिक संधी आणि स्थानिक महिलांना रोजगाराचे नवीन मार्ग उपलब्ध करून देणारा हा उपक्रम भविष्यातील जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा ठरणार आहे.




अकोले, राजगुरुनगर, पेठ, इगतपुरी, नाशिक व गुजरात येथील पारंपरिक वाणांची वैशिष्ट्यपूर्ण झलक बघायला मिळाली. शेंदऱ्या, गोट्या, गबऱ्या, पुंगट्या, आखाड्या, केळ्या, अळण्या, गडदी, फोक आंबा, लाल्या, दुधाळ्या, ढवळ्या, अंबटी, निळा आंबा, काळा चविष्ट, आंबा यांसारख्या औषधीदृष्ट्या बायफसह अलेइमा कंपनीचा पुढाकार महत्त्वाच्या गावरान वाणांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राम कुलकर्णी (सिंबायोसिस), डॉ. सचिन पाचोरकर (उद्योजकता तज्ज्ञ), डॉ. अविनाश अडसुळ (वनस्पतीशास्त्रज्ञ), समीर अधिकारी (गावरान आंबा संवर्धक), डॉ. राहुल बाहळीकर (बायोटेक्नोलॉजिस्ट) बायफ नाशिकचे विभाग प्रमुख सुरेश सहाणे यांनी उपस्थित राहून गावरान आंब्याच्या संवर्धनाबाबत विचार मांडले. या कार्यक्रमाला सेव्हियर्स अशी महत्त्वपूर्ण त्याचप्रमाणे मँगो जीनोम ओळख असलेल्या स्थानिक आंबा संबर्धकांचा विशेष सहभाग होता. एएसके फाऊंडेशनचे अरुण बांबळे आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त ममताबाई भांगरे यांची उपस्थिती लाभली. तसेच शेतकरी तुकाराम गभाले, बाळू घोडे, हैबत भांगरे, भाऊ जोशी, देवराम भांगरे यांचाही सक्रीय सहभाग होता. या महोत्सवाचे नियोजन जीविधा प्रकल्पाचे समन्वयक योगेश नवले यांनी केले. त्यांना रामकृष्ण भांगरे, आनंदा गोलवड, खंडू भांगरे यांचे यांचे मार्गदर्शन लाभले.

> गावरान आंब्यांचे संवर्धन, उपयोग, धार्मिक व औषधी उपयोगाबाबत जनजागृती करणे हे या महोत्सवाचे उद्दिष्ट होते. तसेच स्थानिक पारंपरिक ज्ञानाचे संकलन, दुर्मिळ झाडांचे जीपीएस टॅगिंग, स्थानिक रोपवाटिका निर्मिती, प्रक्रिया उद्योग संधी, स्थानिक अर्थव्यवस्थेत गावरान आंब्याचे योगदान यावर भर देण्यात आला. यावेळी बायफचे जैवविविधता प्रमुख संजय पाटील यांनी सखोल मार्गदर्शन केले.

# गोरक्षणाच्या मुद्द्यावर जनआक्रोश मेळावा

## दुपारी बारापर्यंत पाथर्डी बंद ठेवण्याचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शहरात आणि परिसरात गोरक्षण, गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीत सातत्याने पोलिस आणि प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे हिंदू समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर आज दिनांक १२ जून रोजी सकाळी पाथर्डी शहरातील अजिंठा चौकात भव्य जनआक्रोश मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त दुपारी बारा वाजेपर्यंत पाथर्डी शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पाथर्डी शहरात उघडपणे सुरू असलेली गोमांस विक्री, तिसगाव येथे प्रशासनाच्या नावा खाली सुरू असलेला अवैध कत्तलखाना, गोरक्षक कार्यकर्ते भारत लिपारे यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला या यासारख्या व हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवणाऱ्या घटनांकडे प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप करण्यात येत असून, कायद्याची खुलेआम थट्टा केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. म्हणून हा जनआक्रोश मेळावा ठेवण्यात आला आहे.

याला सकल हिंदू समाज, पाथर्डी तालुका यांच्यातर्फे पाठींबा देण्यात आला आहे. कार्यक्रमात तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, आळंदीचे नामवंत वक्ते संग्राम बापू भंडारे, आमदार गोपीचंद पडळकर, संग्राम जगताप, शिवाजी कर्डिले, मोनिका राजळे, तसेच राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या आंदोलनाचे स्वागतोत्सुक आयोजक हिंदू रक्षा युवामंच, पाथर्डी यांनी सर्व श्रद्धावान हिंदू नागरिकांना या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



# लौकीच्या उपसरपंचपदी किरण शेळके



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लौकी ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच राहुल खंडीझोड यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाचे किरण शेळके यांची बिनविरोध करण्यात आली आहे.

लौकी ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच अजिनाथ खटकाळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत किरण साहेबराव शेळके यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक संकेत शिगांडे यांनी किरण शेळके यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी सरपंच, सर्व सदस्य व काळे गटाच्या कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित उपसरपंच किरण शेळके यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मावळते उपसरपंच राहुल खंडीझोड, सदस्य कांताबाई खिल्लारी, दिपाली खटकाळे, ललिता इंगळे, अनिल आहेर, जिनींग प्रेसिग सोसायटीचे संचालक शिवाजीराव शेळके, राजेंद्र खिलारी, सावळेराम खटकाळे, भाऊसाहेब भवर, दिगंबर जाधव, बबनराव भवर, सागर खटकाळे, विष्णु खटकाळे, बाळासाहेब भवर, रामभाऊ खटकाळे, भागीनाथ शेळके, आबासाहेब जाधव, भाऊसाहेब गोडसे, कैलास शेळके, अनिल भव सतिष खटकाळे, नारायणराव शेळके आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व लौकी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कमालपूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर

## ना. विखे यांच्या आदेशानुसार वेगात काम सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील कमालपूर येथील गोदावरी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रारंभझाला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कमालपूर बंधारा दुरुस्तीचे आदेश अधिकाऱ्यांना दिले होते. बंधारा दुरुस्तीचे काम आता वेगात सुरू झाले आहे. दरम्यान मरणासन्न अवस्थेतील हा बंधारा दुरुस्त होत असल्याने परिसरातील गावांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



बंधारा दुरुस्तीच्या सद्या सुरू असलेल्या कामाची नुकतीच जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून काही सूचना केल्या आहेत. यावेळी वडाळा उपविभागीय कार्यालयाचे अभियंता संजय कल्हापुरे, सुजीत पाटील यांच्यासह किसन मुरकुटे, दत्तात्रय शेळके, विजय दवंगे, भैरव कांगुणे, सोमनाथ भराडे, दादा पाटील तोडमल, सुभाष भराडे आदी उपस्थित होते.

साधारणपणे ५ ते ६ दिवस बंधारा दुरुस्तीचे काम सुरु राहणार आहे. यात बंधाऱ्याच्या रस्त्याचे संपूर्ण काँक्रीटीकरण करून संरक्षक कठड्याचीही दुरुस्ती होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या बंधाऱ्याची दुरुस्ती व्हावी, यासाठी कमालपूर येथील भाजप कार्यकर्ते सुरवातीपासून ना. विखे पाटील यांच्याकडे आग्रही होते.

> ६ एप्रिल रोजी सप्ताह कमिटीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत ना. विखे पाटील यांची श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेऊन त्यासंदर्भात निवेदनही दिले होते. यात परिसरातील काही महत्वाच्या रस्त्यांचीही तातडीने दुरुस्ती व्हावी, अशी मागणी करण्यात आली होती. शनी देवगाव (ता. वैजापूर) येथे यंदाचा सद्गुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह होऊ घातला आहे. यावेळी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होवू नये यादृष्टीने या बंधाऱ्याची दुरुस्ती होणे गरजेचे होते.

# ..तर पालकांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ

## शिलेगाव ग्रामपंचायतीचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील शिलेगाव परिसरातील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता १ ली ते ७ थी च्या वर्गात जे पालक आपल्या मुलांचा या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतील, अशा पालकांची चालू वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करणार असल्याची माहिती सरपंच बेबीताई बर्डे यांनी दिली.

शिलेगाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात सरपंच, उपसरपंच व सदस्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी बर्डे म्हणाले, जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता दिवसेंदिवस सुधारत आहे. मात्र, विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत असल्याचे त्याचा शिक्षणावर मोठा परिणाम होत आहे. नुकत्याच झालेल्या शालांत व इतर परिक्षेत जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच बाजी मारल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांचा जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश घेऊन त्यांचे उज्वल भविष्य घडावे, असे आवाहनही त्यांनी केले. यासाठी चालू शैक्षणिक वर्षात जे पालक आपल्या मुलांचा इयत्ता १ ली ते इयत्ता ७ थी च्या वर्गात प्रवेश घेतील, अशा पालकांची चालू वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्यात येईल, असेही त्यांनी सांगीतले. यावेळी सरपंच, उपसरंपच व सदस्य उपस्थित होते.

# दुचाकीच्या वादातून दोघांना मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील सोनगाव येथे दुचाकीचा कट मारणाऱ्यांना गाडी नीट चालवा म्हटल्याच्या राग आल्याने सोनगाव येथील दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सात्रळ येथील तिघांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी राहुरी पोलिसांत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

सोनगाव येथील प्राजक्त प्रविणकुमार अंत्रे हा युवक सोमवार दि. ८ जूनच्या सकाळी डेअरी मध्ये दूध घालण्यास गेला असताना डेअरीत दूध पोहच करून त्याचा मित्र विन्मय प्रशांत अंत्रे याच्यासोबत घरी येत असताना समोरून सात्रळ येथील अतुल राहुल पडघलमल हा त्याच्या दोन मित्रासमवेत दुचाकीवरून ट्रिपलशिट भरधाव वेगाने येवून प्राजक्त व विन्मय यास कट मारला. या दरम्यान त्यांना गाडी व्यवस्थीत चालवा असे म्हटले, याचा राग आल्याने अतुल व त्याच्या सहकाऱ्यांनी दुचाकीने प्राजक्त व विन्मय यांचा पाठलाग करत सोनगाव शिवारातील अनाप वखारीजवळ त्यांना अडवून अतुल पडघलमल व इतर दोघांनी मिळून प्राजक्त व विन्मय यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरू केली.यावेळी अतुल याने प्राजक्तच्या तोंडावर दगड मारल्याने तो जखमी झाला. हा प्रकार लगतच्या रहिवाश्यांच्या लक्षात येताच ते प्राजक्त व विन्मय यांच्या मदतीला धावल्याने मारहाण करणारे तिघे पळून गेले. दरम्यान प्राजक्त यांच्या खिशातील ३५० रुपये गायब झाले. याप्रकरणी अतुल राहुल पडघलमल व अनोळखी दोघांविरूद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास हवालदार सोमनाथ जायभाय हे करत आहेत.

# नेत्रदानाची चळवळ आणखी जोमाने व्हावी

## मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : संपुर्ण जगभरात १० जुन जागतीक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक नेत्रदान दिवसाचे औचित्य साधुन श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात दि. १० जुन रोजी सकाळी ११ वा. विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करणेत येवुन जागतीक नेत्रदान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर होते.




यावेळी श्री साईबाबा संस्थानचे वतीने श्री साईनाथ नेत्रपेढीध्ये नेत्रदान केलेल्या आठ नेत्रदात्यांच्या परिवारांचा सन्मान सोहळा तसेच याचबरोबर नेत्ररोपण झालेल्या ११ रुग्णांचाही यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी गाडीलकर यांनी नेत्रदानाची चळवळ ही आणखी जोमाने पुढे नेवुन ही चळवळ घराघरात पोहचवावी, असे आवाहन केले. नेत्रदात्यांच्या परिवाराच्या सत्कारावेळी मल्हारवाडी येथील नेत्रदाते साहिल प्रशांत दोशी वय वर्ष-१२ व दिव्या प्रशांत दोशी वय वर्ष-१५ या नेत्रदात्याच्या परिवारांचा आजी, आजोबा, वडील, बहीण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते सत्कार होताना परिवारा बरोबरच संपुर्ण सभागृह भावुक झाले.

यावेळी वैद्यकीय संचालक, लेफ्ट कर्नल, डॉ. शैलेश ओक, से. नि, उपवैद्यकीय संचालक, डॉ. प्रितम वडगावे, डॉ. अजित पाटील, डॉ. सौदामिनी निघुते, डॉ. अनघा विखे, मंदा थोरात, श्रीमती नजमा सय्यद यांचेसह हॉस्पिटल व कर्मचारी व अधिकारी नेत्रदात्यांचे परिवार व नेत्ररोपन झालेल्या रुग्ण व रुग्णांचा परिवार यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्तावीक वैद्यकीय अधिक्षीका, डॉ. मैथिली पितांबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे यांनी केले.

# शेतीच्या वादातून महिलेस मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : तालुक्यातील वंजारवाडी येथे शेतीच्या वादातून महिलेस कोयत्याने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. दि. ८ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी सुनीता अनिल काकडे (वय ४९, रा. गोपाळ वस्ती वंजारवाडी) या आपल्या शेतामध्ये मशागत करत होत्या. त्याचवेळी त्या ठिकाणी आरोपी प्रकाश शामराव काकडे, दिपाली प्रकाश काकडे, निखिल प्रकाश काकडे (सर्व रा. गोपाळ वस्ती वंजारवाडी) व राज पटारे (रा. तरवडी) हे त्या ठिकाणी आले व 'तुम्ही येथे मशागत करायची नाही' असे म्हणत हातातील कोयत्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच राणी खंडागळे या भांडणे सोडवण्यासाठी मध्ये गेल्या असता त्यांना देखील शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांचे मार्गदर्शनाखाली हवालदार अनिल बडे हे करत आहेत.

# अमृतवाहिनीत 'जलसंपत्ती नियोजन' यावर प्रशिक्षण

## २ ते ६ जून दरम्यान पार पडले लघुकालिन प्रशिक्षण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हिल अभियांत्रिकी विभागातील संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित एक आठवड्याचा लघुकालीन प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २ ते ६ जून या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी दिली आहे.




२ जून रोजी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी डॉ. डी. जी. रेगुलवार यांनी "जलाशय संचालनासाठी उत्क्रांतीवादी अल्गोरिदमचे मूलतत्त्व व उपयोग" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी जेनेटिक अल्गोरिदम वापरून जलसंपत्ती व्यवस्थापनाच्या समस्यांचे निराकरण कसे करता येते याचे स्पष्टीकरण दिले. दुपारच्या सत्रात त्यांनी हवामान बदल आणि त्याचा सिंचन नियोजनासाठी उपयोग या विषयावर व्याख्यान दिले.

३ जून रोजी प्रा. वाय. जे. बारोकर यांनी "हवामान बदल आणि त्याचे मूलभूत मूल्यांकन" यावर सैद्धांतिक सत्र घेतले. त्यांनी हवामान डेटाचे विश्लेषण व मॉडेलिंग यामागील प्रक्रिया स्पष्ट केली. ४ जून रोजी प्रा. वाय. जे. बारोकर यांनी "डाउनस्केलिंग तंत्राचा उपयोग" या विषयावर प्रात्यक्षिक सत्र घेतले. ५ जून रोजी डॉ. जे. बी. गुरव यांनी "रेषीय प्रोग्रामिंगचे मूलतत्त्व व जलव्यवस्थापनातील उपयोग" या विषयावर व्याख्यान घेतले. त्यांनी सॉफ्टवेअरच्या मदतीने प्रत्यक्ष मॉडेलिंग कसे करावे हे शिकवले. ६ जून रोजी शेवटच्या दिवशी डॉ. पी. आर. सराफ यांनी हायड्रोलॉजिकल मॉडेलिंग सॉफ्टवेअरबाबत माहिती दिली. त्यांनी पर्जन्यमान, मातीतील गाळ व जलप्रवाह यांचे मॉडेलिंग करण्याची प्रक्रिया सविस्तरपणे समजावून सांगितली.

> कार्यक्रमाचे संयोजन डॉ. जे. बी. गुरव (संयोजक व शैक्षणिक संचालक, ) यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. डॉ. एस. बी. कांडेकर (विभागप्रमुख) यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, विभागप्रमुख डॉ. एस. बी. कांडेकर यांची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी पाठ्यचर्या, पाठ्यक्रम व अभियांत्रिकी शिक्षणातील संबंधांवर मार्गदर्शन केले.

